दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक २८ । शनिवार ७ नोव्हेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

शिरूरच्या राजकारणात भूकंप; धारीवालांच्या वर्चस्वाला धक्का!

नितीन पाचर्णे उपनगराध्यक्षपदी बिनविरोध

शिरूर : शिरूर नगरपालिकेच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून, उद्योजक प्रकाश धारीवाल यांच्या राजकीय वर्चस्वाला धक्का बसला आहे. मावळते उपनगराध्यक्ष मितेश गादिया यांच्याविरोधात अविश्वास ठराव आणल्यानंतर माजी आमदार स्व. बाबूराव पाचर्णे यांचे पुतणे नितीन पाचर्णे यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.

विशेष म्हणजे, राजकीय विरोध बाजूला ठेवत पाचर्णे यांचे दोन गट एकत्र आल्याने शिरूरमध्ये नवी सत्तासमीकरणे उदयास आली आहेत. आमदार ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली कटके, भाजपचे प्रदीप कंद, राहुल पाचर्णे आणि अभिजीत पाचर्णे यांच्या भूमिकेची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

अवघ्या आठ महिन्यांतच धारीवाल यांच्या पुढाकारातून उभ्या राहिलेल्या राजकीय आघाडीला तडा गेल्याने या घडामोडी महत्त्वपूर्ण मानल्या जात आहेत. दरम्यान, प्रकाश धारीवाल यांनी अद्याप प्रतिक्रिया दिलेली नाही. माजी आमदार अशोक पवार यांच्या गटाची पुढील भूमिका काय असेल, याकडेही लक्ष लागले आहे.

मतदार यादीतून नाव गेले तर...
सरकारी लाभही जाणार?

'मतचोरी नव्हे, हक्कांची चोरी' : आधारऐवजी मतदार ओळखपत्रावरून लाभार्थी निश्चित करण्याच्या निर्णयावरून राहुल गांधी आक्रमक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नवी दिल्ली : मतदार यादीतील नाव आणि सरकारी योजनांचे लाभ यांची सांगड घालण्याच्या केंद्र सरकारच्या भूमिकेवरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. आधार कार्डऐवजी मतदार ओळखपत्राच्या आधारे सरकारी योजनांचे लाभार्थी निश्चित करण्याच्या घोषणेवर त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. मतदार यादीतून एखाद्या नागरिकाचे नाव वगळले गेले, तर त्याला मतदानाच्या अधिकारासोबतच सरकारी योजनांच्या लाभांनाही मुकावे लागू शकते, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

केंद्रीय पंचायत राज व मत्स्यव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह ऊर्फ ललन सिंह यांनी ३० ऑक्टोबर रोजी नवीन पंचायती राज योजनेची घोषणा करताना लाभार्थ्यांची ओळख पटविण्यासाठी आधारऐवजी मतदार ओळखपत्रावरील ईपीआयसी क्रमांक वापरण्यात येणार असल्याचे सांगितले होते. यापूर्वी सरकारी योजनांचे लाभ वितरित करण्यासाठी आधारचा वापर केला जात होता. नव्या व्यवस्थेत बायोमेट्रिक प्रमाणीकरणासोबत मतदार ओळखपत्राचा क्रमांक ओळखीचा आधार असेल, असे त्यांनी स्पष्ट केले होते.



याच घोषणेचा धागा पकडत राहुल गांधी यांनी समाजमाध्यमावरील पोस्टमधून सरकारला लक्ष्य केले. विशेष सखोल मतदार पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेच्या माध्यमातून कोट्यवधी नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रक्रियेमुळे भाजपवर नाराज असलेल्या मतदारांना लक्ष्य केले जात असल्याचा दावाही त्यांनी केला. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावरही त्यांनी टीका केली.

मतदार ओळखपत्र सरकारी योजनांसाठी अनिवार्य झाल्यास रेशन, पेन्शन, मनरेगा, घरकुल, शिष्यवृत्ती आणि आरक्षणासारख्या सुविधांवर परिणाम होऊ शकतो, असा इशारा राहुल गांधी यांनी दिला. मतदानाचा अधिकार हा कोणत्याही अटींशिवाय मिळालेला नागरिकांचा हक्क आहे. गरीब नागरिकांची पेन्शन त्यांच्या मतदार ओळखपत्रावर अवलंबून असू शकत नाही, असे त्यांनी ठामपणे म्हटले. दरम्यान, आधारऐवजी मतदार ओळखपत्र वापरण्याच्या घोषणेचा प्रत्यक्ष अंमलबजावणीतील परिणाम काय असेल, तसेच मतदार यादीत नाव नसलेल्या नागरिकांच्या सरकारी लाभांबाबत कोणती व्यवस्था असेल, याबाबत केंद्र सरकारकडून अधिक स्पष्टता येणे अपेक्षित आहे.

'नाव वगळले, मत गमावले आणि मत गमावले तर हक्क गमावले', अशा शब्दांत त्यांनी संभाव्य धोक्याचे गांभीर्य अधोरेखित केले. सरकार जनतेने सरकार निवडण्याऐवजी सरकारने आपल्या पसंतीचे मतदार निवडण्याची व्यवस्था निर्माण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. हा केवळ मतांचा नव्हे, तर नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा प्रश्न असल्याचे सांगत काँग्रेस हा प्रकार घडू देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

अहील्यानगरच्या ८ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ४०३ कोटी जमा : ना. विखे पाटील

संकटातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहील्यानगर : अहील्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली असून नूकसानीपोटी अग्रीम मदत जिल्ह्यातील सुमारे ८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये प्रत्येकी पाच हजार रुपयांची मदत जमा झाली आहे. या माध्यमातून सुमारे ४०३ कोटी ६४ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाले असल्याची माहिती जलसंपदा तथा अहील्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

शेतकऱ्यांवरील संकटाच्या काळात त्यांना केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष आर्थिक मदत मिळवून देणे आवश्यक आहे, ही भूमिका पालकमंत्री विखे पाटील यांनी सातत्याने मांडली आहे. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा, वीजपुरवठा आणि शेतीच्या नुकसानीसंदर्भात प्रशासनाच्या माध्यमातून विविध उपाययोजनांचा आढावा मंत्री विखे पाटील सातत्याने घेत आहेत.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा सातत्याने आढावा घेत शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी शासनस्तरावर केलेल्या पाठपुराव्याच्या पार्श्वभूमीवर या मदत वितरणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये पावसाचे दिलेली ओढ , पिकांची झालेली हानी, घटलेले उत्पादन आणि वाढता शेतीचा खर्च यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते.राज्य सरकारने नूकसानीपोटी शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रीम मदत दिवाळीपुर्वी देण्याची घोषणा केली होती. दुष्काळाची गंभीरता लक्षात घेऊन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात टंचाई आढावा बैठका घेवून प्रत्येक तालुक्यातील परिस्थितीचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अहवाल यांना सादर केला होता. प्रशासनाला आवश्यक उपाय योजनांसाठी सूचना दिल्या होत्या. राज्य सरकारने शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या मदतीसाठी पहील्या ट्रीगर मध्येच जिलह्याचा समावेश झाल्याने शासनाकडून तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी पाठपुरावा केला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन मदत वितरणाची प्रक्रिया राबविली. त्यानुसार जिल्ह्यातील सुमारे८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये प्रत्येकी पाच हजार रुपयांप्रमाणे ४०३कोटी ६४ लाख रूपये जमा झाले आहेत. थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून ही मदत वितरित झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळाला आहे.आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना तातडीच्या गरजा भागविण्यासाठी आधार मिळणार असून आगामी शेती हंगामाच्या तयारीसाठीही या रकमेचा उपयोग होऊ शकतो. उर्वरित पात्र लाभार्थ्यांपर्यंतही मदत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना पालकमंत्री विखे पाटील यांनी दिल्या आहेत.

कौटुंबिक त्रासातून तरुणाची नदीत उडी; दोन दिवसानंतर मृतदेह सापडला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : कौटुंबिक वादातून होणारा मानसिक व शारीरिक त्रास सहन न झाल्याने एका ३५ वर्षीय तरुणाने प्रवरा नदीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली होती. दोन दिवसा नंतर त्याचा मृतदेह नदीपात्रात आढळून आला. या प्रकरणी मयत तरुणाची पत्नी, सासू-सासरे, मेव्हणा यांच्यासह आठ जणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सतीष आप्पासाहेब वाणी, (वय ३५ वर्षे, रा. झरेकाठी, ता. संगमनेर, हल्ली रा. लोणी, ता. राहाता), असे मृत तरुणाचे नाव आहे. तो लोणी येथील प्रवरा हॉस्पिटलमध्ये गेल्या १५ वर्षांपासून कर्मचारी म्हणून कार्यरत होता. त्याचे लग्न २०१७ मध्ये झाले होते. मात्र लग्नानंतर पत्नी व तिच्या माहेरच्या मंडळींकडून पैशांवरून तसेच घराच्या मालकीवरून वाद होत असे. सतिष वाणी यांनी लोणी येथे घर बांधल्यानंतर ते पत्नीच्या नावावर करण्यासाठी सतीष यांच्यावर दबाव टाकण्यात आला. त्याला धमकावून घर पत्नीच्या नावावर करून घेतले. या सततच्या त्रासा बाबत सतीष यांनी आपल्या आई- वडिलांना सांगीतले होते. २१ जून २०२६ रोजी लोणी येथील घरी पत्नी व नातेवाइकांनी पैशांवरून वाद घालून सतीष यांना मारहाण करुन घराबाहेर काढून दिले. त्यानंतर सतीष भाड्याच्या खोलीत एकटाच राहू लागला. १७ ऑक्टोबर रोजी लोणी पोलीस ठाण्यात कौटुंबिक तक्रारीवरुन दोन्ही बाजूच्या लोकांना बोलावण्यात आले होते. यावेळी पत्नीने घटस्फोटाची (पान ४ वर)

शेअर बाजार फसवणूक प्रकरण : तिघांचा अटकपूर्व जामीन फेटाळला

उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय; १ कोटी ६१ लाखांच्या फसवणुकीचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : तालुक्यात गाजत असलेल्या शेअर बाजार गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील चंद्रकला कवडे, कल्याण कवडे आणि महेंद्र कवडे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळला आहे. त्यामुळे आरोपींना मोठा धक्का बसला असून, गुंतवणूकदारांचे या निकालाकडे लक्ष लागले आहे.

शेवगाव येथील अवधूत विनायक केदार यांनी साईनाथ कल्याण कवडे याच्यासह अन्य आरोपींविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. आरोपींनी 'ॲसिटिक सोल्युशन्स' या शेअर ट्रेडिंग कंपनीच्या माध्यमातून गुंतवणुकीवर १२ टक्के परताव्याचे आमिष दाखवून फिर्यादीसह अन्य गुंतवणूकदारांची १ कोटी ६१ लाख ४२ हजार ९०० रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी २८ ऑक्टोबर २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपींचा जिल्हा व सत्र न्यायालयातील अटकपूर्व जामीन अर्ज यापूर्वीच फेटाळण्यात आला होता. त्यानंतर उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अर्जावर न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्यासमोर सुनावणी झाली. फिर्यादीच्या वतीने ॲड. प्रशांत गिरी यांनी जोरदार युक्तिवाद केला. त्यांना ॲड. योगेश कासोद यांचे सहकार्य लाभले. न्यायालयाने युक्तिवाद व कागदपत्रांचे अवलोकन करून तिघांचाही जामीन अर्ज फेटाळला. या निर्णयामुळे गुंतवणूकदारांना दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

जिल्हा बँकेचा अध्यक्ष कोण...
भाजपचा अध्यक्ष की मित्रपक्षाला संधी?

फडणवीसांच्या निर्णयाकडे नजरा : राजळे, विखे, कोल्हे, काळे, गडाख यांच्या नावांची चर्चा; १२ नोव्हेंबरला सत्तेचा फैसला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत विखे-थोरात सहकार्य एक्स्प्रेसने निर्विवाद वर्चस्व मिळविले असले, तरी आता अध्यक्षपदाच्या खुर्चीवर कोण विराजमान होणार, हा जिल्ह्याच्या राजकारणातील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला आहे. भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी अध्यक्षपदाचा उमेदवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच निश्चित करतील, असे स्पष्ट केल्याने या निवडीचे राजकीय महत्त्व आणखी वाढले आहे. १२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या संचालक मंडळाच्या पहिल्या बैठकीत अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाचा फैसला होणार आहे.

जिल्हा बँकेत भाजपचे (पान ४ वर)







पालकमंत्री विखे पाटलांनी घेतली सभापती शिंदेंची भेट...



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी एकमेकांच्या विरोधात भूमिका घेणारे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी शुक्रवारी सायंकाळी अचानकपणे विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या चौंडी (ता.जामखेड) येथील निवासस्थानी जाऊन भेट घेतली व बंद खोलीत तासभराहून अधिक वेळ चर्चा केली. ही भेट केवळ दिवाळी शुभेच्छांसाठी होती की सुजय विखे जिल्हा बँक अध्यक्षपदासाठी इच्छुक असल्याच्या पार्श्वभूमीवर घेतलेली भेट होती, याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

महिलेला संधी मिळणार का?

जिल्हा बँकेच्या ६८ वर्षांच्या इतिहासात आजवर एकाही महिलेला अध्यक्षपदाची संधी मिळालेली नाही. यंदा संचालक मंडळात सहा महिला निवडून आल्या आहेत. त्यामुळे यंदा हा इतिहास बदलणार का, हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. त्याचबरोबर अध्यक्षपदाची संधी अडीच-अडीच वर्षांसाठी विभागून देण्याचाही पर्याय चर्चेत असल्याचे समजते

जुन्या अनुभवाला की नव्या चेहऱ्यांना पसंती?


नव्या संचालक मंडळात १० जुने आणि ११ नवे चेहरे आहेत. मोनिका राजळे, बिपीन कोल्हे, शंकरराव गडाख आणि आशुतोष काळे यांच्यासारख्या अनुभवी संचालकांसमोर डॉ. सुजय विखे पाटील, प्राजक्त तनपुरे, नीलेश लंके यांसारख्या नव्या संचालकांची उपस्थिती आहे.

देवी-देवतांचा अपमान करणाऱ्यांविरोधात पतंजली दाखल करणार खटले : स्वामी रामदेव

मालागाव येथे तीन दिवसीय हर्बल कुंभाची सांगता; पुढील वर्षी ऑक्टोबरमध्ये पुन्हा आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

हरिद्वार : भगवान राम, श्रीकृष्ण, हनुमान यांच्यासह देवी-देवतांचा अपमान करणाऱ्या आणि आक्षेपार्ह वक्तव्ये करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यासाठी पतंजलीच्या वतीने विशेष पथक स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा योगऋषी स्वामी रामदेव यांनी केली. कोणत्याही धर्माच्या श्रद्धास्थानांचा अवमान होता कामा नये. सर्व धर्म आणि महापुरुषांचा आदर राखला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.



उत्तराखंडमधील पौडी गढवाल जिल्ह्यातील यमकेश्वर तालुक्यातील मालागाव येथे आयोजित तीन दिवसीय हर्बल कुंभ-जडीबुटी कृषी मेळा आणि श्री धन्वंतरी धाम महोत्सवाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. ४ ते ६ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या या महोत्सवात देशभरातील तज्ज्ञ, शेतकरी, संत आणि मान्यवर सहभागी झाले होते. तीन दिवसांत अडीच हजारांहून अधिक जणांनी सहभाग नोंदविला.

आचार्य बाळकृष्ण यांनी श्री धन्वंतरी धामला प्राचीन भारतीय ज्ञान, आधुनिक विज्ञान, आयुर्वेद, कृषी आणि निसर्ग यांचा जागतिक दर्जाचा संगम बनविण्याचा संकल्प व्यक्त केला. येथे ज्ञानमार्ग, मनोरंजन उद्यान, साहसी खेळ, सायकलिंग ट्रॅक तसेच साधना आणि ध्यानासाठी विशेष गुहा विकसित करण्यात येणार आहेत. हे केंद्र ज्ञान, प्रशिक्षण आणि पर्यटनाचेही प्रमुख ठिकाण बनेल, असे त्यांनी सांगितले.

स्वामी रामदेव यांनी धन्वंतरी धामच्या उभारणीतील आचार्य बाळकृष्ण यांच्या पाच वर्षांच्या परिश्रमांचे कौतुक केले. पुढील वर्षी ऑक्टोबरमध्ये हर्बल कुंभ अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

गोकुळचा फॉर्म्युला सतेज पाटलांनीच द्यावा; मुश्रीफांची ऑफर!

अध्यक्ष निवडीचा पेच सोडविण्याचे आवाहन; महाविकास आघाडीच्या भूमिकेकडे लक्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) अध्यक्षपदाच्या निवडीवरून सुरू असलेल्या सत्तासंघर्षात महसूल मंत्री हसन मुश्रीफ यांनी काँग्रेस नेते सतेज पाटील यांना थेट पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे. अध्यक्ष निवडीसाठी योग्य फॉर्म्युला सतेज पाटील यांनीच सुचवावा, आम्ही त्यांना कुठेही रोखलेले नाही, असे वक्तव्य मुश्रीफ यांनी केल्याने गोकुळमधील राजकीय घडामोडींना नवे वळण मिळाले आहे.

गोकुळच्या २५ संचालकांपैकी सतेज पाटील यांच्या समविचारी आघाडीकडे १३, तर महायुतीकडे १२ संचालक आहेत. मात्र, अध्यक्ष निवडीसाठी आवश्यक १४ सदस्यांची गणपूर्ती होत नसल्याने निवडीचा पेच निर्माण झाला आहे. महायुतीच्या संचालकांनी पहिल्या बैठकीला अनुपस्थिती दर्शविल्याने हा प्रश्न अधिकच (पान ४ वर)

आरोग्य व्यवस्थेला उपचारांची गरज!

कारवाईचा धडाका स्वागतार्ह; पण व्यवस्थेतील रोग मुळापासून दूर होणार का ?

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सध्या एका विचित्र विरोधाभासातून जात आहे. एका बाजूला सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची कमतरता, औषधांचा तुटवडा, अपुरी साधनसामग्री आणि रुग्णांची हेळसांड सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला सरकारी आरोग्य यंत्रणेतील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीमुळे संपूर्ण व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. अशा परिस्थितीत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सुरू केलेली आरोग्य संवाद यात्रा आणि त्यातून सुरू झालेला कारवाईचा धडाका निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, प्रश्न केवळ काही अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा किंवा बदल्या करण्याचा नाही, तर राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला जडलेला आजार कायमचा बरा करण्याचा आहे.

आरोग्य संवाद यात्रेच्या पहिल्याच दिवशी नांदेड जिल्ह्यातील लोहा, मुखेड, हिमायतनगर आणि सोनखेड परिसरातील आरोग्य संस्थांना भेटी देताना मंत्र्यांना अनेक धक्कादायक वास्तवांचा सामना करावा लागला. आरोग्यसेवेतील अनियमितता, बेजबाबदारपणा आणि कर्तव्यातील कसूर यांची गंभीर दखल घेत त्यांनी संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि डॉक्टरांवर कारवाईचे आदेश दिले. काहींवर तातडीची कारवाई, काहींच्या चौकशीचे आदेश, तर काहींच्या बदल्यांचे निर्देश देण्यात आले. आरोग्यमंत्री केवळ मंत्रालयात बसून अहवाल पाहण्याऐवजी प्रत्यक्ष रुग्णालयात जाऊन परिस्थिती तपासत असतील, तर त्यातून प्रशासनाला निश्चितच संदेश जातो. सरकारी खुर्ची म्हणजे अधिकार उपभोगण्याचे साधन नसून जनतेची सेवा करण्याची जबाबदारी आहे, याची जाणीव अशा कारवाईतून करून देण्याची गरज आहे.

मात्र, नांदेडमध्ये जे चित्र समोर आले ते केवळ एका जिल्ह्यापुरते मर्यादित आहे, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर वेळेवर उपलब्ध नसणे, रुग्णांना औषधांसाठी बाहेर पाठवणे, प्रयोगशाळा आणि वैद्यकीय उपकरणे असूनही त्यांचा वापर न होणे, रुग्णवाहिका वेळेवर न मिळणे अशा तक्रारी सातत्याने पुढे येतात. प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण जनतेसाठी आरोग्य व्यवस्थेचे पहिले दार आहे. मात्र, याच दारात डॉक्टर नसतील, उपचार मिळत नसतील आणि रुग्णांना खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत असेल, तर सरकारी आरोग्य यंत्रणेच्या अस्तित्वाचा उपयोग काय? गरीब माणसाला आजारपणात उपचार मिळवण्यासाठी कर्ज काढावे लागत असेल, तर आरोग्यसेवेच्या लोककल्याणकारी संकल्पनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते.

दुसरीकडे, सार्वजनिक आरोग्य विभागाने महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील १ हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ६७४ विशेषज्ञ आणि ७६६ एमबीबीएस डॉक्टरांचा समावेश आहे. राज्यातील ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये डॉक्टरांची उपलब्धता वाढवण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा निर्णय आहे. रिक्त पदे भरल्याशिवाय आरोग्यसेवेचा दर्जा उंचावणे शक्य नाही.



विशेषतः स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ आणि इतर विशेषज्ञ डॉक्टर ग्रामीण रुग्णालयांमध्ये उपलब्ध झाले, तर अनेक रुग्णांना जिल्हा रुग्णालय किंवा मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज भासणार नाही. मात्र, नियुक्ती आदेश देणे आणि प्रत्यक्ष रुग्णालयात डॉक्टर रुजू होणे यामध्ये मोठे अंतर असते. त्यामुळे नियुक्त झालेल्या डॉक्टरांना दुर्गम भागात टिकवून ठेवण्यासाठी निवास, सुरक्षितता, आवश्यक सुविधा आणि प्रोत्साहनपर योजना देण्याचीही तितकीच गरज आहे.

आरोग्य विभागातील प्रश्न केवळ डॉक्टरांच्या संख्येपुरते मर्यादित नाहीत. डॉक्टर असले तरी परिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधनिर्माण अधिकारी, रुग्णवाहिका कर्मचारी आणि इतर सहाय्यक मनुष्यबळ पुरेसे नसेल, तर आरोग्यसेवेचे चक्र पूर्ण होऊ शकत नाही. त्याचबरोबर रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक उपकरणे खरेदी केली जातात; पण प्रशिक्षित कर्मचारी किंवा देखभालीअभावी ती धूळ खात पडतात. इमारती उभ्या राहतात; पण त्यामध्ये सेवा देण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ नसते. अशा नियोजनशून्यतेमुळे कोट्यवधींचा सार्वजनिक निधी खर्च होऊनही सामान्य माणसाला अपेक्षित उपचार मिळत नाहीत.

आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सुरू केलेल्या संवाद यात्रेचे महत्त्व याच ठिकाणी अधोरेखित होते. ही यात्रा केवळ तपासणी, पाहणी आणि निलंबनापुरती मर्यादित राहता कामा नये. प्रत्येक जिल्ह्यातील आरोग्य संस्थांचे प्रत्यक्ष कामकाज, मंजूर आणि रिक्त पदे, औषधसाठा, उपकरणांची स्थिती, रुग्णसेवेचा दर्जा आणि रुग्णांच्या तक्रारी यांचा वस्तुनिष्ठ आढावा घेतला पाहिजे. कारवाई करताना दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालू नये; त्याचवेळी केवळ आकसापोटी किंवा राजकीय दबावातून प्रामाणिक कर्मचाऱ्यांवर अन्यायही होता कामा नये. जबाबदारी निश्चित करताना पारदर्शकता आणि न्याय्य प्रक्रिया आवश्यक आहे.

सरकारी आरोग्य यंत्रणेत कामचुकारपणा करणाऱ्यांना कारवाईचा धाक असलाच पाहिजे; पण प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना कामासाठी आवश्यक साधने आणि पाठबळही मिळाले पाहिजे. अन्यथा निलंबन आणि बदल्यांच्या बातम्या काही दिवस चर्चेत राहतील; पुन्हा परिस्थिती जैसे थे होईल.

आरोग्य हा नागरिकांचा मूलभूत प्रश्न आहे. तो कोणत्याही राजकीय पक्षाच्या यशापयशाचा विषय नसून शासनाच्या संवेदनशीलतेची कसोटी आहे. नांदेडमधील कारवाईने आरोग्य विभागातील निष्क्रिय यंत्रणेला धक्का दिला असेल, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. मात्र, या धक्क्याचे रूपांतर कायमस्वरूपी सुधारणांमध्ये झाले पाहिजे. नवीन डॉक्टरांची भरती, रिक्त पदांची पूर्तता, औषधांची उपलब्धता, सुसज्ज रुग्णालये आणि उत्तरदायी प्रशासन या पाच गोष्टींवर शासनाने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

कारण रुग्णालयातील एखादा निष्क्रिय डॉक्टर किंवा बेजबाबदार अधिकारी हा केवळ प्रशासकीय प्रश्न नसतो; त्याच्या निष्काळजीपणामुळे एखाद्या गरीब रुग्णाचा जीवही जाऊ शकतो. त्यामुळे आरोग्यमंत्र्यांनी सुरू केलेली कारवाई ही केवळ अधिकाऱ्यांच्या धाब्यांवर पाणी आणणारी न राहता सामान्य रुग्णाच्या मनात सरकारी रुग्णालयांविषयी विश्वास निर्माण करणारी ठरली पाहिजे. आरोग्य व्यवस्थेतील आजार गंभीर आहे. त्यावर तात्पुरती मलमपट्टी नव्हे, तर कायमस्वरूपी उपचारांची गरज आहे!

दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांची पेठेत गर्दी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री
राहुरी : राजेंद्र परदेशी

दुष्काळी परिस्थिती असूनही आंधारातून प्रकाशाकडे नेणारा आनंदाचा दिवाळीचा सण अवघ्या एक दिवसांवर येऊन ठेपला असून, राहुरीची बाजारपेठ सध्या दिवाळीच्या उत्सवी सजावटीत न्हाऊन निघाली आहे. राहुरी शहरात दिवाळी साहित्यासाठी उभारलेल्या रंगीबेरंगी स्टॉल्सना नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.

रंगीबेरंगी आकाशकंदील, पारंपरिक मातीच्या पणत्या, आकर्षक चायनीज पणत्या, तोरणे, रांगोळी, झाडू, किल्ले आणि सैनिकांच्या मूर्ती असे विविध साहित्य विक्रीसाठी उपलब्ध आहे. १० रुपयांपासून ७००-८०० रुपयांपर्यंतच्या दरात आकाशकंदीलांची विक्री सुरू असून लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे.

दिवाळी म्हटले की नवीन कपडे आणि फराळ यांशिवाय सण अपुरा. त्यामुळे कपड्यांची दुकानेही झगमगली आहेत. रेडिमेड कपडे, साड्या आणि मुलांसाठी आकर्षक पोशाख खरेदीसाठी गर्दी वाढली आहे. तसेच लाडू, चिवडा, करंजी यांसारख्या फराळासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदीही जोमात सुरू आहे. किरणा दुकानदारांकडे तेल, रवा, साखर, खोबरे, सुके मेवे यांच्या खरेदीसाठी ग्राहकांची लगबग दिसून येत आहे. फटाक्यांच्या दुकानावर गर्दी दिसून येत आहे. पण त्या रांगोळी लक्ष्मीपूजनाचे साहित्य व वेगवेगळ्या प्रकारच्या लक्ष्मीच्या मूर्ती दारावरच्या सजावटींची तोरणे फुलांची तोरणे

अशा अनेक व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांमुळे पेठ गजबजली असून गोरगरिबांपासून श्रीमंतापर्यंत दिवाळी सणाची खरेदी दुष्काळी परिस्थितीत सुद्धा सुरू आहे.

एकल महिला, निराधारांच्या मदतीसाठी ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था सरसावली



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री
टाकळीभान: श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील सामाजिक क्षेत्रामध्ये अग्रेसर असणाऱ्या व विविध समाज उपयोगी उपक्रम राबविणाऱ्या ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने गावातील १११ एकल निराधार महिला यांना किराणा किट(शिधा) वाटून त्यांची दिवाळी गोड केली. २०२६ या वर्षी पर्जन्यमान कमी झाल्याने दुष्काळ पडला असून गोरगरीब मजूर यांना हाताला काम नसल्याने त्यांना सणवार साजरे करण्यासाठी अडचणी येत आहेत. दीपावली हा हिंदू संस्कृती मधील वर्षातला मोठा सण असून हा सण सर्वत्र उत्साहात साजरा केला जातो. परंतु एकल निराधार महिला अनाथ बालके यांना या दुष्काळ परिस्थितीची झळ पोहचल्याने त्या निराधारांना किराणा किट (शिधा)वाटून त्यांची दिवाळी गोड करण्यासाठी ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या सरसावली असून संस्थेच्या वतीने टाकळीभान गावातील १११ एकल महिला अनाथ बालके यांना किराणा किट वाटप करण्यात आले. यावेळी निराधार एकल महिला ,अनाथ बालके यांना किराणा शिधेचा आधार देऊन त्यांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न केला असल्याचे संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत यांनी बोलताना सांगितले.

याप्रसंगी राष्ट्रवादी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे व प्रा. कार्लस साठे सर यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले व विविध संघटनांनी, समाजसेवी संस्थांनी या दुष्काळ परिस्थितीमध्ये निराधारांना आधार द्यावा असे आवाहन केले.ज्येष्ठ ग्रामस्थ श्रीधर गाडे, सामाजिक कार्यकर्ते भैया पठाण, पत्रकार दिलीपराव लोखंडे, अशोकराव रणनवरे,अक्षय कोकणे, सुजित बोडखे,सुरज गलांडे, बंटी मगर, बाळासाहेब सावंत आदी वाटप प्रसंगी उपस्थित होते. यावेळी ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने गावातील एकल महिलांच्या घरोघरी जाऊन किराणा किट दिले. याप्रसंगी किराणा किट स्वीकारताना काही निराधार महिलांना अश्रू अनावर झाले. व संस्थेने त्यांना मायेचा आधार दिल्याने त्यांनी संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत व मित्र मंडळाचे मनापासून आभार व्यक्त केले.

साई आदर्श मल्टीस्टेटतर्फे सभासदांना लाभांश, कर्मचाऱ्यांना बोनसचे वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री
राहुरी : साई आदर्श मल्टीस्टेट पतसंस्थेच्या वतीने दिवाळीनिमित्त सभासदांना लाभांश आणि कर्मचाऱ्यांना बोनसचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमामुळे सभासद व कर्मचाऱ्यांचा दिवाळीचा आनंद द्विगुणित झाला. प्रेरणा उद्योग समूहाचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास ताहाराबाद येथील संत कवी महिपती महाराज देवस्थानचे मठाधिपती महंत अर्जुन महाराज तनपुरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी संस्थेच्या चेअरमन संगीता कपाळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. संस्थापक चेअरमन शिवाजीराव कपाळे यांनी प्रास्ताविकातून संस्थेची आर्थिक प्रगती, यशस्वी वाटचाल आणि भविष्यातील उद्दिष्टांची माहिती दिली.

महंत अर्जुन महाराज तनपुरे म्हणाले, सभासद आणि कर्मचाऱ्यांच्या कष्टातून संस्थेची प्रगती झाली आहे. दिवाळीच्या काळात लाभांश व बोनस देऊन



संस्थेने त्यांच्या आनंदात भर घातली आहे. सहकाराच्या माध्यमातून सर्वसामान्यांना आर्थिक बळ देण्याचे कार्य असेच सुरू ठेवावे. कोरोना काळापासून शिवाजीराव कपाळे हे दरवर्षी दिवाळीत कर्मचाऱ्यांना किराणा साहित्य देत असून ही परंपरा कायम राहावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात सुरेश वाबळे म्हणाले की, ''साई आदर्श मल्टीस्टेटची ही यशस्वी प्रगती म्हणजे सभासदांचा दृढ विश्वास, संचालक मंडळाचे अचूक नियोजन आणि कर्मचाऱ्यांचे प्रामाणिक कष्ट यांचे एकत्रित फलित आहे. लाभांश आणि बोनस देऊन संस्थेने सर्व घटकांची दिवाळी खऱ्या अर्थाने आनंददायी केली आहे.'' या सोहळ्याला आदर्श नागरी पतसंस्थेचे उपाध्यक्ष आबासाहेब वाळुंज, बाळासाहेब तांबे, किशोर थोरात, बाळासाहेब वरखडे, शांती चौक मित्र मंडळाचे अध्यक्ष दीपक त्रिभुवन, अविनाश साबरे, प्रकाश सोनी, किशोर कोबरणे, भास्कर कोळसे, सुनील संचेती, विजय साळवे, श्रीकांत गोपाळे, संजय कदम, शरद देसाई, सीताराम मुसमाडे ,गायकवाड गुरुजी, मॅनेजर सचिन खडके व साई आदर्श परिवार यांसह संस्थेचे संचालक, सभासद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळी संकटात शेतकऱ्यांच्या पाठीशी : आ. प्राजक्त तनपुरे

आ. तनपुरेंनी केला वरशिंदे व ताहाराबादचा दुष्काळी दौरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री
राहुरी : संपूर्ण महाराष्ट्र व अहिल्यानगर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीचा व पाणीटंचाईचा आढावा घेण्यासाठी माजी राज्यमंत्री तथा अहिल्यानगर विधान परिषदेचेआमदार प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी तालुक्यातील वरशिंदे आणि ताहाराबाद परिसराचा तातडीने दुष्काळी परिस्थितीचा पाहणी दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

यवर्षी निसर्गाच्या लहरीपणामुळे अत्यंत कमी झाल्या पावसामुळे सगळीकडचीच भूजल पातळी खालावल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित पाहणी दौऱ्यात शेतकरी बांधवांनी आपल्या व्यथा आमदार तनपुरे यांच्यासमोर मांडल्या. पिके कशी करपून जात आहेत आणि सिंचनाचा प्रश्न कशा प्रकारे निर्माण झालाआहे, या परिस्थितीची कहाणी शेतकऱ्यांनी आमदार तनपुरे यांच्यापुढे यावेळी गांभीर्याने मांडली. शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आमदार प्राजक्त तनपुरे यांनी उपस्थितांना धीर दिला. ते म्हणाले, ''सध्याची दुष्काळी परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. अशा कठीण प्रसंगात शेतकरीराजा एकटा नसून, आम्ही सर्वजण त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी टँकर सुरू करणे, जनावरांसाठी चारा छावण्या उभारणे तसेच इतर तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि शासन स्तरावर तातडीने पाठपुरावा केला जाईल. कोणावरही अन्याय होऊ देणार नाही व प्रत्येक शेतकरी कुटुंब माझेच समजून कुटुंबाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी पूर्ण ताकदीने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहणार असल्याचे आमदार तनपुरे यांनी सांगितले.

या दुष्काळ पाहणी व संवाद दौऱ्यात स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी परिसरातील अनेक नागरिक, शेतकरी व विविध आघाड्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने स्थानिक ग्रामपंचायत पदाधिकारी, शेतकरी प्रतिनिधी, विविध विकास संस्थांचे संचालक व कार्यकर्ते, परिसरातील ज्येष्ठ ग्रामस्थ, महिला आणि तरुण शेतकरी यांचा समावेश होता. या दौऱ्यामुळे स्थानिक प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याबाबतचे निर्देश मिळतील आणि दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी व नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

ऊसतोड कामगारांसोबत दिवाळी साजरी

अँकर असोसिएशन व सोशल सर्व्हिस फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री
श्रीरामपूर : समाजातील प्रत्येक घटकाला दिवाळीचा आनंद घेता यावा, या सामाजिक भावनेतून अँकर असोसिएशन, श्रीरामपूर आणि सोशल सर्व्हिस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अशोकनगर व निपाणी वडगाव परिसरातील ऊसतोड कामगारांना दिवाळी फराळ व नवीन वस्त्रांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे कष्टकरी कामगारांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.



ऊसतोड कामगार साखर उद्योगासाठी वर्षभर कष्ट घेत असतात. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना सणांचा आनंद घेणे अनेकदा कठीण होते. ही बाब लक्षात घेऊन संस्थांच्या वतीने कामगारांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ॲड. आदिनाथ जोशी यांनी केले. अध्यक्षस्थानी सलीमखान पठाण होते. यावेळी प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये, डॉ. संगीताताई फासाटे, प्रा. लक्ष्मण कोल्हे, सोशल सर्व्हिस फाउंडेशनचे अध्यक्ष सूरज सूर्यवंशी, प्रा. बबनराव तागड, यादव करपे, योगेश अभंग यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी एमपीएससी परीक्षेची तयारी करणारे प्रज्वल ढाकणे यांचा सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. उपक्रमासाठी किशोर आण्णा निर्मळ, कृष्णा कलेक्शन आणि ऊसतोड कामगार आसाराम वारे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रसन्ना धुमाळ यांनी केले. कष्टकरी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्याचा हा उपक्रम सामाजिक एकोपा आणि सेवाभावाचा आदर्श ठरला.

बँका, पतसंस्थांनी सभासदांना आवश्यक माहिती देणे बंधनकारक; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री
श्रीरामपूर : बँका आणि सहकारी पतसंस्थांच्या कामकाजाशी संबंधित कागदपत्रे मिळविण्याचा सभासदांचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकालाडरे अधोरेखित केला आहे. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार, सहकारी संस्थेच्या कारभाराशी संबंधित विशिष्ट कागदपत्रे सभासदाला उपलब्ध करून देता येतात. त्यामुळे माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँका व पतसंस्थांना हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

'द मूप्पाथडम सर्व्हिस को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड विरुद्ध स्टेट चीफ इन्फॉर्मेशन कमिशनर व इतर' या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात नागरी अपील क्रमांक १३९०६ व १३९०७/२०२६ दाखल करण्यात आले होते. संबंधित बँकेच्या एका सभासदाने बांधकामासाठी केलेल्या कराराची प्रत आणि मागील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताची प्रत मागितली होती. मात्र, माहिती देण्यास नकार दिल्याने हे प्रकरण न्यायालयात गेले.

सर्वोच्च न्यायालयाने बँकेची दोन्ही अपिले फेटाळून सहकार निबंधकाला संबंधित कागदपत्रे मागवून दोन आठवड्यांच्या आत सभासदाला देण्याचे आदेश दिले. सहकारी संस्था स्वतः माहिती अधिकार कायद्यातील सार्वजनिक प्राधिकरण नसली, तरी सहकार निबंधकाला कायद्यानुसार उपलब्ध असलेली कागदपत्रे माहिती अधिकाराच्या माध्यमातून मिळविता येऊ शकतात, असे या निर्णयातून स्पष्ट झाले आहे.

मात्र, बँकेतील प्रत्येक व्यवहाराची किंवा इतर सभासदांच्या खात्यांची माहिती सरसकट मागता येणार नाही. वैयक्तिक व गोपनीय माहितीला माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८ नुसार संरक्षण आहे.

या निर्णयामुळे बँका व पतसंस्थांच्या कामकाजात पारदर्शकता वाढण्यास मदत होणार असून सभासदांनी आपल्या अधिकारांची जाणीव ठेवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

जुन्या देयकांना डावलून नंतरची बिले अदा कशी? आ. बोरणारेंचा अधिकाऱ्यांना जाब

रोहयोच्या प्रलंबित देयकांवरून आढावा बैठकीत संताप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री
वैजापूर : रोजगार हमी योजनेतील २०२२-२३ या आर्थिक वर्षातील अनेक देयके अद्याप प्रलंबित असताना नंतरच्या वर्षातील बिले अदा केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. कार्यालयात जाऊन भेटणाऱ्यांचीच बिले आधी काढली जातात का, असा थेट सवाल आमदार रमेश बोरणारे यांनी उपस्थित केला. वारंवार तक्रारी करूनही कामकाजात सुधारणा होत नसल्याने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

खासदार संदीपान भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी पंचायत समिती सभागृहात दुष्काळ निवारण आढावा बैठक झाली. यावेळी तालुक्यातील दुष्काळसदृश परिस्थिती, अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीची भरपाई, पीक



विमा, शेतकऱ्यांना आर्थिक मदत आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता या विषयांचा आढावा घेण्यात आला.

रोजगार हमी योजनेच्या देयकांबाबत आमदार बोरणारे यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. जुन्या वर्षातील देयके प्रलंबित ठेवून नंतरच्या वर्षातील बिले कशी अदा केली जातात, असा सवाल त्यांनी केला. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळत नसतील तर प्रशासन नेमके कोणासाठी काम करीत आहे, अशी नाराजीही त्यांनी व्यक्त केली.

नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांनी फार्मर आयडी नसल्यामुळे अनेक शेतकरी दुष्काळी मदतीपासून वंचित राहिल्याचा मुद्दा उपस्थित केला. या शेतकऱ्यांना मदत कधी मिळणार, असा सवाल करत कृषी विभागाच्या फळबाग योजनेची मागील दोन वर्षांपासूनची देयके थकीत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

पंचायतसमितीसभापती वंदना शिंदे यांनीही अधिकाऱ्यांच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त केली. सभापती असूनही वारंवार सूचना देऊन कामे होत नसतील, तर सामान्य नागरिकांचे काय हाल होत असतील, असा सवाल त्यांनी केला. महिला सभापती असल्यामुळे त्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केले जात आहे का, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. यावर आमदार बोरणारे यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना कामात सुधारणा करण्याचे निर्देश देत कारवाईचा इशारा दिला.

बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे, माजी आमदार भाऊसाहेब चिकटगावकर, उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, तहसीलदार सुनील सावंत, मुख्याधिकारी भागवत बिघोत, उपनगराध्यक्ष रियाझ शेख, जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे, राहुल शेळके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मराठा सुकाणू समितीच्या वतीने आदित्य ठाकरे यांचा सन्मान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री
नेवासा : शिवसेना युवा नेते आदित्य ठाकरे यांचा मक्तापूर शिवसेना व मराठा सुकाणू समितीच्या वतीने प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.राज्यातील दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना पाठबळ व मार्गदर्शन करण्याचे काम करत राहू असा निर्धार गणेश झगरे यांनी ठाकरे यांच्याशी बोलतांना व्यक्त केला

यावेळी मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्यासह शिवसेनेचे तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण यांच्या वतीने आदित्य ठाकरे यांचा नेवासा फाटा येथे सत्कार करून स्वागत करण्यात आले तसेच नेवासा फाटा परिसरातील मक्तापूर गावातील



शेतकऱ्यांच्या वतीने आदित्य ठाकरे यांना गणेश झगरे यांनी निवेदन दिले

या निवेदनात गणेश झगरे यांनी म्हटले की सध्याला खाजगी बँक ही शेतकऱ्यांकडून पैसे वसूल करते शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव नाही व शेतकऱ्यांना अडवणूक केली जाते असे अनेक प्रश्न आदित्य ठाकरे यांच्याकडे गणेश झगरे यांनी मांडले.

यावेळी युवा नेते उदयन दादा गडाख,मुन्ना चक्रनारायण,जिल्हाध्यक्ष रामदास गोल्हार,शेतकरी सतीश बर्डे,टिल्लू गव्हाणे, सचिन गायकवाड,नारायण लष्करे, पत्रकार बादल परदेशी,आबासाहेब शिरसाठ,योगेश गायकवाड,बाळासाहेब कदम,तालुका अध्यक्ष मच्छिंद्र म्हस्के,माजी सभापती रावसाहेब कांगुणे यांच्यासह शिवसैनिक ग्रामस्थ उपस्थित होते

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

मंत्री म्हणून लोकांची जबाबदारी कुटुंबातील सदस्यांप्रमाणे स्वीकारावी लागते : ना. विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : सार्वजनिक जीवनात काम करताना केवळ पद, अधिकार आणि राजकीय जबाबदारी यापुरता विचार करून चालत नाही. आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्या सामान्य माणसांच्या अपेक्षा समजून घेऊन त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे महत्त्वाचे असते. मंत्री म्हणून काम करतांना एखाद्या कुटूंबाप्रमाणे लोकांची जबाबदारी स्विकारून काम करावे लागते. दुष्काळाच्या संकटाच्या काळात मनावर दबाव ठेवून पाण्याचे नियोजन करावे लागत असल्याची भावना राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.



शिर्डी मध्ये आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात बोलतांना मंत्री विखे पाटील यांनी राज्यातील दुष्काळाच्या दाहकतेवर भाष्य करून सरकार आणि जलसंपदा विभागाचा मंत्री म्हणून सध्या कराव्या लागत असलेल्या निर्णयावर भाष्य केले.

राज्यात दुष्काळाची दाहकता खूप मोठी आहे.सांगली सातारा कोल्हापूर भागात यंदा पाण्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत.मराठवाड्यात याची दाहकता आणखी वेगळी आहे.सर्व जिल्ह्यांमध्ये जावून पाण्याचे नियोजन करून दिले. निसर्गाने थोडी साथ दिल्यामुळे आपल्याकडे पाणी उपलब्ध आहे.पण पाण्याचे निर्णय करताना धरणातील पाणी साठा,त्या भागातील गरजा, शेतीच्या पाण्याचे नियोजन करताना प्रचंड दबाव असतो कारण नियोजनात कोणतीही चूक होवू नये,एखादी गंभीर चूक झालीच तर परिणाम किती भोगावे लागतील असा विचार करून काम करावे लागत असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

मंत्री विखे पाटील म्हणाले की,लोकांना फक्त आम्ही गाड्यांमध्ये फिरताना दिसतो. पण सार्वजनिक जीवनात काम करताना एखाद्या कुटूंबाप्रमाणे जबाबदारी घ्यावी लागते. राजकारणात अनेक पदे आणि जबाबदाऱ्या मिळतात; मात्र या पदांच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडविता आला पाहिजे. लोक आपल्याकडे मोठ्या अपेक्षेने येतात. त्यांच्या प्रश्नांकडे कुटूंबातील अडचणीप्रमाणे आपण पाहातो.शिर्डीची विकासात्मक वाटचाल करताना अनेक चांगले वाईट प्रसंग आले.पण यामध्ये आपल्या मनाला कधी स्वार्थ शिवाला नाही.

सामान्य माणसाचा विश्वास संपादन करणे ही मोठी जबाबदारी आहे. लोकांच्या प्रश्नांना वेळ देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि शक्य तिथे तातडीने मदत करण्याची भूमिका आजपर्यंत बजावली म्हणूनच या भागातील लोकांनी सलग आठवेळा त्यांचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिल्याचे मंत्री विखे पाटील यांनी आवर्जून सांगितले.

द • ख • ल

राहुरी स्टेट बँक - स्वामी विवेकानंद आयुर्वेद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिर



राहुरी : राहुरी येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या राहुरी शाखेमध्ये डॉ . तनपुरे कारखाना संचलित स्वामी विवेकानंद नर्सिंग होम आयुर्वेद महाविद्यालय यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. राहुरी बाजार समितीलगत स्टेट बँक ऑफ इंडिया राहुरी शाखेत झालेल्या या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात रक्तगट तपासणी, नाडी गती तपासणी, सामान्य शारीरिक तपासणी, साखर तपासणी, डोळ्यांची व कानाची मूलभूत तपासणी, संधिवात व अन्य प्रकारच्या तपासण्या विवेकानंद नर्सिंग होम आयुव द महाविद्यालयाचे तज्ञ डॉक्टर व तज्ञ स्टाफ यांनी केल्या स्टेट बँकेच्या ग्राहक ठेवीदारांसह नागरिकांचा या तपासणी शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी शिबिराचे आयोजक स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखा अधिकारी सुनील पवार, अंजूम पठाण, रवि शंकर बिलोरे, अतुल बंगाळ, वंदना वाघ अन्य अधिकारी स्टाफ तसेच आयुर्वेद महाविद्यालयाचे डॉ. अपर्णा खपके, डॉ. ऋतिका सुरतकर, डॉ. आकाश हजारे, डॉ. तेजस माखाडे, डॉ. ऋषिकेश यदमाळ, ब्रदर बापू बलमे उपस्थित होते.

गणेशच्या कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन मिळवून दिल्याबद्दल अॅड. काळे यांचा सत्कार



माळवाडगांव : गणेश सहकारी साखर कारखाना सेवानिवृत्त कर्मचारी यांचे १ कोटी ५७ लाख थकीत वेतन मिळवून दिल्याबद्दल कामगारांच्या वतीने शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अँड अजित काळे यांचा सत्कार करण्यात आला. गणेश कारखाना सेवानिवृत्त कर्मचारी यांचे एक कोटी ५७ लाख थकीत वेतन मिळवून दिल्याबद्दल शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अँड अजित काळे यांच्यासह,जिल्हाध्यक्ष विठ्ठल शेळके, सचिव रूपेंद्र काले यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रवक्ते कार्लस साठे, संपर्कप्रमुख साहेबराव चोरमल युवा तालुकाध्यक्ष शरद आसने खिर्डीचे सरपंच प्रभाकर कांबळे.

सतीश नाईक, अँड प्रशांत कापसे, संदीप उघडे, अरविंद साळवे. भाऊसाहेब गव्हाणे सोपान नाईक,गणेश कारखान्याचे निवृत्त कर्मचारी बाबुराव जाधव दीपक धनवटे विठ्ठलराव घुले बाळासाहेब पवार दिलीप चौधरी गणेश आग्रे ज्ञानेश्वर धनवटे सुनील डोखे, नानासाहेब बोर्डे अमोल झीने वेनुनाथ शेळके, साहेबराव फंड, ज्ञानेश्वर बडाख, अजित बडाख सुनील लोहकरे रमेश देशमुख यांच्यासह गणेश साखर कारखाना निवृत्त कर्मचारी पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

डावखर कन्या विद्यालयाचा प्रदूषण मुक्त दिवाळीचा संकल्प



श्रीरामपूर : महाराष्ट्र सेवा मंडळ संचलित शंकरराव सतोबा डावखर कन्या विद्यालयात प्रदूषण मुक्त दिवाळीच्या संकल्पनेतून दिवाळी सेलिब्रेशन उत्साहात साजरे करण्यात आले. मुख्याध्यापिका सुवर्णमाला बोधक यांच्या कल्पनेतून पणती सजावट व आकाशकंदील निर्मिती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थिनींनी आकर्षक रंगसंगती व कलाकुसरीने पणत्या सजवत मनमोहक आकाशकंदील तयार करून आपल्या सर्जनशीलतेचे दर्शन घडविले. या कार्यक्रमास जिल्हा व सत्र न्यायालयाच्या स्टेनोग्राफर भारती भेसर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

तसेच संस्थेचे विश्वस्त कांतीशेठ पटेल व शांतीलाल पटेल यांचे चिरंजीव प्रतिश पटेल व निशित पटेल यांची विशेष उपस्थिती होती. विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या उपक्रमामुळे त्यांच्यात आत्मविश्वास व कलात्मक दृष्टिकोन विकसित झाला. कार्यक्रम यशस्वितेसाठी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपाध्यापक म्हसू गांगुर्डे, रजनीकांत तोरणे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन औटी यांनी केले.

दुष्काळग्रस्त पाथरेतील ५५० कुटुंबांची दिवाळी गोड

शालिनीताई विखे यांचा सामाजिक बांधिलकीचा संदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सोनगाव : दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या गरजू कुटुंबांच्या दिवाळीत गोडवा निर्माण करण्यासाठी डॉ. सुजय विखे पाटील मित्रमंडळाच्या वतीने पाथरे येथे ५५० कुटुंबांना मोफत साखरेचे वाटप करण्यात आले. सलग दुसऱ्या वर्षी राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला. 'समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो, ही भावना प्रत्येकाने जपली पाहिजे. गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे हाच खऱ्या सामाजिक कार्याचा हेतू आहे,' असा माणुसकीचा संदेश माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी यावेळी दिला.

दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक कुटुंबांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत सणाचा आनंद प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने मित्रमंडळाने साखर वाटपाचा उपक्रम आयोजित केला. संकटाच्या काळात गरजू कुटुंबांच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याचे या उपक्रमातून दाखवून देण्यात आले.

यावेळी शालिनीताई विखे पाटील यांनी ग्रामस्थांनी गावातील एकोपा कायम ठेवून विकासकामांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. आरोग्य, वीज आणि पाणी या मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी विखे पाटील कुटुंब ग्रामस्थांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. जलसंधारणाच्या माध्यमातून गावाचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठीही प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भास्कर विश्वनाथ घोलप होते. सरपंच उमेश गिताराम घोलप, भाऊसाहेब कदम, मुन्नाभाई शेख, ताराचंद कडू, गंगाभाऊ कडू, विलासराव घोलप, दिलीप घोलप, नितीन घोलप, सर्जेराव कदम, बाळासाहेब कडू, संतोष कदम, किशोर कडू यांच्यासह मित्रमंडळाचे पदाधिकारी, महिला व ग्रामस्थ उपस्थित होते. ५५० कुटुंबांना मिळालेली साखर ही केवळ दिवाळीची भेट नसून, अडचणीच्या काळात एकमेकांच्या मदतीला धावून जाण्याचा माणुसकीचा संदेश ठरली.

नेवासा येथे मेडिकल असोसिएशनतर्फे धन्वंतरी पूजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : धनत्रयोदशीच्या मंगलमय पर्वाचे औचित्य साधून नेवासा मेडिकल असोसिएशनच्या वतीने धन्वंतरी पूजन करून ज्येष्ठ डॉक्टरांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.डॉक्टर पाल्यांचा ही यावेळी सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. नेवासा ते नेवासाफाटा रस्त्यावरील हॉटेल कृष्णा च्या सभागृहात हा सोहळा उत्साहपूर्ण आणि स्नेहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. विष्णूकांत देवरे होते. तर ज्येष्ठ डॉ. भाऊसाहेब घुले, डॉ. राजेंद्र शिर्के, नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले, स्त्रीरोग तज्ज्ञ तथा नगरसेविका डॉ. मनिषा वाघ,असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. किशोर गळनिंबकर, उपाध्यक्ष डॉ.निर्मला सांगळे खजिनदार डॉ. संदीप देशमुख, उपाध्यक्ष डॉ. गणेश नांदे असोसिएशनचे सक्रिय सदस्य डॉ. वरुणराज देवरे व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी धन्वंतरी देवतेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.नेवासा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. किशोर गळनिंबकर यांनी प्रमुख अतिथी, उपस्थित डॉक्टर मंडळी आणि त्यांच्या कुटुंबीयांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी पूजनाला विशेष महत्त्व असून आरोग्यसेवेच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याची प्रेरणा या पूजनातून मिळते, असे त्यांनी यावेळी सांगितले. वैद्यकीय क्षेत्रातील प्रदीर्घ, उल्लेखनीय कार्य आणि नेवासा मेडिकल असोसिएशनसाठी दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल ज्येष्ठ डॉक्टर डॉ. चंद्रकांत शेजुळ, डॉ. अशोक झरेकर आणि डॉ. लक्ष्मणराव खंडाळे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. डॉक्टरांच्या सेवाभावी कार्याचा गौरव, ज्येष्ठांचा सन्मान आणि नव्या पिढीला प्रोत्साहन देणारा हा सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शंकर वंजारे यांनी केले.मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.किशोर गळनिंबकर यांनी उपस्थित सदस्यांचे आभार मानले.

मला राजकारण शिकवण्याच्या फंदात पडू नका : आ. अमोल खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : मला राजकारण कळत नाही, असा काहींचा समज असेल तर त्यांनी तो मनातून काढून टाकावा. दिवाळीनंतर राजकारणाचे डावपेच कसे खेळायचे असतात, हे दाखवून देऊ. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे व माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यासोबत काम करण्याची संधी मला मिळाली आहे. त्यामुळे मला राजकारण शिकवण्याच्या फंदात कोणीही पडू नका. दिवाळीनंतर डावपेच काय आहे हे मी तुम्हाला दाखवून देईल असा घनाघात आ. अमोल खताळ यांनी माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि पदवीधर आ. सत्यजित तांबे यांचे नाव न घेता केला.

संगमनेर शहरातील अकोले नाका परिसरात शिवसेनेच्या शिव वाहतूक सेनेचे उद्घाटन आ. खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर शिवसेनेचे शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, विभागप्रमुख बाळासाहेब जगदाळे, आरपीआयचे शहरप्रमुख कैलास कासार, उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, शाखाप्रमुख भैया रंगरेज, उपशाखाप्रमुख सागर अभंग, सचिव, प्रकाश खंडागळे, कार्याध्यक्ष नितीन पानसरे यांच्यासह शिवसैनिक व कार्यकर्ते उपस्थित होते.



आमदार खताळ म्हणाले की, संगमनेर नगरपालिका निवडणुकीत यश मिळाले म्हणून विरोधकांनी हुरळून जाऊ नये. तुमचे नगरसेवक टक्केवारी वसूल करण्याचे काम करतात; मात्र आमचे कार्यकर्ते नगरसेवक नसले तरी जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी रस्त्यावर उतरून जनसेवक म्हणून काम करत आहे. तसेच लवकरच आरोग्यमंत्री संगमनेरमध्ये येऊन येथील आरोग्य व्यवस्था सक्षम करण्याच्या दृष्टीने पावले उचलणार असल्याचे आ. खताळ यांनी सांगितले. निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून काम करणारा आमचा पक्ष नाही. जनतेच्या प्रश्नांसाठी चोवीस तास कार्यरत राहणे, हेच आमचे ध्येय आहे. सामान्य कार्यकर्त्याला जनतेने संधी दिल्यामुळेच आज मी आमदार झालो आहे. शिववाहतूक सेनेच्या स्थापनेच्या निमित्ताने रिक्षाचालकांना संघटित करून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचेही आमदार खताळ यांनी सांगितले.

चित्रकलेत कुंचल्याच्या रंगांनी जयवर्धन मानेदेशमुख राज्यस्तरावर गरुड भरारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धा २०२६ मध्ये जयवर्धना गणेश मानेदेशमुख यांनी राज्यात द्वितीय क्रमांक पटकावून आपल्या शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. कल्पकतेला सर्जनशीलतेची जोड, कलेला मेहनतीची साथ आणि स्वप्नांना जिद्दीचे यशाचे नवे क्षितित गाठले आहे.



राज्यभरातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत जयवर्धनने आपल्या चित्रातून कल्पकता, कलात्मकता, निरीक्षणशक्ती आणि सर्जनशीलतेचा सुंदर आविष्कार साकारला. रंगांची प्रभावी सांगड, विषयाची कल्पक मांडणी आणि चित्रातील बारकावे यामुळे त्याच्या कलाकृतीने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. विविध शाळांमधून आलेल्या असंख्य कलाकृतींमध्ये त्याच्या चित्राने विशेष ठसा उमटवत राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला.

लहान वयातच चित्रकलेची आवड जोपासत जयवर्धनने आपल्या कलेला सातत्यपूर्ण सरावाची जोड दिली. चित्रातील कल्पना प्रभावीपणे मांडण्याची हातोटी, रंगांचा योग्य वापर आणि विषयाकडे पाहण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन यामुळे त्याची कलाकृती उठून दिसली. त्याच्या या यशामुळे केवळ त्याच्या वैयक्तिक कलागुणांना वाव मिळाला नसून प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कूलच्या कला क्षेत्रातील गुणवत्तेचीही राज्यस्तरावर दखल घेतली गेली आहे.

जयवर्धनच्या या यशासाठी प्राचार्या सौ. शैलजा घोरपडे, कलाशिक्षक श्री. सतीश जाधव, सौ. भारती थाटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी जयवर्धनच्या कलागुणांना योग्य दिशा देत त्याला सातत्याने प्रोत्साहित केले.

पुणतांबा पोलीस ठाण्यातच गुन्हे दाखल करण्याची व्यवस्था करा, मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : पुणतांबा व परिसरातील ग्रामस्थांना तक्रार दाखल करण्यासाठी राहाता येथे जावे लागत असल्याने गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणे पुणतांबा पोलीस दूरक्षेत्रातच गुन्हे दाखल करण्याची व्यवस्था सुरू करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब चव्हाण यांनी राहाता पोलीस निरीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पुणतांबा येथे राहाता पोलीस ठाण्यांतर्गत दूरक्षेत्र कार्यरत असून, या ठिकाणी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांवर परिसरातील चार ते पाच गावांच्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी आहे. मात्र, एखादी घटना घडल्यास किंवा तक्रार दाखल करावयाची असल्यास ग्रामस्थांना राहाता पोलीस ठाण्यात जावे लागते. पुणतांबा ते राहाता हे अंतर लक्षात घेता तक्रार दाखल करण्यास विलंब होतो. काही वेळा तक्रार दाखल करू नये म्हणून फिर्यादीवर दबाव आणला जातो, तसेच तडजोडी करण्याचे प्रकारही घडतात, असा आरोप चव्हाण यांनी निवेदनात केला आहे.

परिसरात गुंडगिरी आणि अवैध धंद्यांचे प्रमाण वाढल्याने भांडणे व मारामारीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक निर्माण करण्यासाठी पुणतांबा येथेच गुन्हे दाखल करण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

यापूर्वीचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांनी पुणतांबा येथेच तक्रारी दाखल करण्याची व्यवस्था केली होती. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांची संख्याही वाढविली होती. सध्याच्या पोलीस निरीक्षकांनीही ही व्यवस्था पूर्ववत सुरू ठेवावी, अशी मागणी चव्हाण यांनी केली आहे.

या मागणीचे निवेदन राहाता पोलीस निरीक्षकांसह जिल्हा पोलीस अधीक्षक, राज्याचे गृहमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही पाठविण्यात आले आहे.

ने.ता.३०/१२/२०२६

जाहिर नोटीस

अॅड. ए. आर. पठाण
दिनांक :- ३०/१०/२०२६
मोबा नं.९८२२०५०९३७

नेवासा येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ यांचे न्यायालयात
फौजदारी चौकशी अर्ज नंबर २३२/२०२६

अर्जदार : आसीफ नुरमंहमद शेख वय ५१, धंदा मजुरी रा. नेवासा खुर्द ता. नेवासा जि.अ.नगर

सामनेवाला : मा. निबंधक जन्म मृत्यु नोंदणी तथा मुख्याधिकारी नेवासा नगरपंचायत, नेवासा ता. नेवासा जि.अ.नगर

ज्याअर्थी नेवासा न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज नंबर २३२/२०२६ आसीफ नुरमंहमद शेख वय ५१, धंदा मजुरी रा. नेवासा खुर्द ता. नेवासा जि.अ.नगर यांनी जन्म मृत्यु कायदा १९६९ कलम १३ अन्वये अर्जदार याचा जन्म दिनांक ०१/०६/१९७५ रोजी मौजे नेवासा खुर्द ता. नेवासा जि.अ.नगर येथे घरी झाला अशी जन्माची नोंद होवून जन्माचा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून दिनांक ३०/१०/२०२६ रोजी किंवा ३० पर्यंत स्वतः किंवा वकिलामार्फत हजर होवून हरकती करावयात. योग्य मुदतीत कुणीही हरकत या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेवून त्यांचे जन्माचा तारखेचा हक्क सिद्ध झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराचे हक्कात आदेश करील. नेवासा

दिनांक :-
३०/१०/२०२६

शिक्का

आदेशावरुन
सहा अधीक्षक
न्यायदंडाअधिकारी प्रथम वर्ग
नेवासा

ने.ता.०६/११/२०२६

जाहिर नोटीस

अॅड. ए. आर. पठाण
दिनांक :- ३०/१०/२०२६
मोबा नं. ९८२२०५०९३७

नेवासा येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ यांचे न्यायालयात
फौजदारी चौकशी अर्ज नंबर २२९/२०२६

अर्जदार : गुलाब रसुल शेख, वय ५५. धंदा मजुरी रा. भातकुडगांव ता. शेवगांव जि.अ.नगर ह.मु. नेवासा खुर्द, संभाजीनगर ता. नेवासा जि.अ.नगर

सामनेवाला : मा. निबंधक जन्म मृत्यु नोंदणी तथा
मुख्याधिकारी नेवासा नगरपंचायत, नेवासा ता. नेवासा जि.अ.नगर

ज्याअर्थी नेवासा न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज नंबर २२९/२०२६ अर्जदार गुलाब रसुल शेख वय ५५, धंदा मजुरी रा.भातकुडगांव ता. शेवगांव जि.अ.नगर ह.मु. नेवासा खुर्द, संभाजीनगर ता. नेवासा जि.अ.नगर यांनी जन्म मृत्यु कायदा १९६९ कलम १३ अन्वये अर्जदाराची मयत आई नामे रुबाब रसुल शेख ही दि.०५/१०/२०१६ रोजी मौजे नेवासा खुर्द ता. नेवासा येथे मयत झालेले आहे. अशी मृत्युची नोंद नोंद होवून मृत्युचा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून दिनांक २२९/२०२६ रोजी किंवा ३० पर्यंत स्वतः किंवा वकिलामार्फत हजर होवून हरकती करावयात. योग्य मुदतीत कुणीही हरकत या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेवून त्यांचे जन्माचा तारखेचा हक्क सिद्ध झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराचे हक्कात आदेश करील. नेवासा

दिनांक : ३०/१०/२०२६

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधीक्षक
न्यायदंडाअधिकारी प्रथम वर्ग
नेवासा

नेमलेली तारीख : २५/११/२०२६

जाहिर नोटीस

अॅड.डी.आर. धिर्डे
नेवासा कोर्ट,

नेवासा येथील मे. ज्युडि. मॅजि. साहेब वर्ग १
यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अ.नं.२५०/२०२६

अर्जदार-पुजा दिलीप ठुबे (लग्नापुर्वीचे नांव पुजा पोपट गोरे), वय-४०, धंदा-घरकाम, रा.भिव धानोरा, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर मो.नं. ९८३४७७०५९६

सामनेवाला-निबंधक तथा ग्रामसेवक साहेब, ग्रामपंचायत वरखेड, ता. नेवासा
जि. अहिल्यानगर

वरील अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदाराने तिचा ता. २५/०५/१९८६ रोजी मौजे वरखेड, ता. नेवासा येथे तिचा जन्म झालेला आहे. व तिचे जन्माची नोद होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरील वादासंबंधी कुणाचेही काही म्हणणे असेल किंवा कुणाची काही हरकत असेल तर या जाहिर नोटिस प्रसिध्द तारखेपासुन एक महिण्याचे आत अथवा दि. २५/११/२०२६ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित राहुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. तसेच उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची एकतर्फी सुनावणी होवुन योग्य तो हुकुम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०६/११/२०२६ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटिस दिली असे.

नेवासा
नेमलेली तारीख
तयार करणार
कनिष्ठ लिपिक

शिक्का

हुकुमावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
नेवासा

प्रो.फी जमा रु.
प्रो.पा.नं.
ने.ता. १६/१२/२८

जाहिर नोटीस

आर.व्ही.सिनारे,
अॅडव्होकेट, श्रीरामपुर,
ता. ६/११/२०२६

श्रीरामपुर येथील मे. ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब वर्ग १ यांचे कोर्टात
कि.चौ.अ. क्रमांक ६०९/२०२६

नि.

अर्जदार - उषा रमेश शेळके, वय-५३ धंदा-नोकरी, रा. देवगिरी कॉलनी पढेगांव, ता.जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द-निबंधक, जन्म मृत्यु उपजत मृत्यु व विवाह नोंदणी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, गोंडेगांव ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर,

सामनेवाले-अर्ज-जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३-३ अन्वये

ज्याअर्थी अर्जदाराचे वडील पेत्रस नामदेव येवले हे दिनांक २/४/२०२० रोजी अर्जदाराची बहीण सुशिला नाना कदम हीचे राहते घरी मौजे गोंडेगांव ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर येथे मयत झालेले आहेत, तथापी मयत पेत्रस नामदेव येवले यांचे दिनांक २/४/२०२० रोजीचे मृत्युचे तारखेची नोंद सरकार दप्तरी होवु शकलेली नाही व याबाबत सामनेवाले यांचेकडे मागणी केली असता त्यांनीही दिनांक १४/१/२०२५ रोजी सदरची मृत्युची नोंद दप्तरी आढळुन येत नसलेबाबत लेखी दाखला देवुन कळविले आहे, म्हणुन सदर अर्ज आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहितगार वकील साहेबांमार्फत योग्य त्या पुराव्यानिशी या मे. कोर्टात हजर होवुन आपली हरकत नोंदवावी, अन्यथा अर्जदाराचा लागलीच पुरावा घेण्यात येवुन त्यांचे मागणीप्रमाणे दाखला देणेबाबत आदेश पारीत केला जाईल.

आजरोजी
माझे सहीनिशी व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

कामगिरी क्लार्क,
फौजदारी न्यायालय, श्रीरामपुर

सहायक अधिक्षक,
फौजदारी न्यायालय, श्रीरामपुर

निशाणी नं.
दिनांक

जाहिर नोटीस

अॅड. के. डी. मोरे
नेवासा कोर्ट

नेमलेली तारीख : ०२/१२/२०२६

नेवासा येथील मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब, यांचे न्यायालयात
किरकोळ चौकशी अर्ज नं. २६८/२०२६

अर्जदार - भैय्यासाहेब ऊर्फ भैय्या दत्तात्रय खोळंबे, वय ३२ वर्ष, व्यवसाय शेती, रा. गोगलगांव, ता. नेवासा जि. अहिल्यानगर

सामनेवाले-निबंधक तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडाळा बहिरोबा, ता. नेवासा जि. अहिल्यानगर

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. न्यायालयात जन्म अणि मृत्यु अधिनियम कायदा १९६९ चे कलम १३ (३) नुसार अर्ज अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद होऊन मिळणेसाठी दाखल केलेला असुन अर्जदार हा वरील ठिकाणचा रहिवाशी आहे. अर्जदाराचा मुलगा नामे राघव भैय्यासाहेब खोळंबे याचा जन्म दिनांक २५/०६/२०२४ रोजी मौजे वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथे अर्जदाराची पत्नीच्या माहेरी राहत्या घरी झाला आहे. अर्जदाराच्या मुलाचा जन्म दवाखान्यात झालेला नाही. सदर राघव भैय्यासाहेब खोळंबे याचे आईवडिलांनी त्याचे जन्माची नोंद सा.वाला ग्रामपंचायतीकडे दिली होती. राघव भैय्यासाहेब खोळंबे यास शाळेत अॅडमिशन करावयाचे आहे त्यासाठी सदर दाखल्याची आवश्यकता आहे. परंतु सा. वाला ग्रामपंचायतीचे जन्म रजिस्टरला त्याचे जन्माची नोंद नाही.

असे की, अर्जदार यांनी ग्रामपंचायत वडाळा बहिरोबा ता. नेवासा येथे मुलाच्या जन्माच्या दाखल्याची मागणी केली मात्र ग्रामपंचायत वडाळा बहिरोबा यांचे रेकॉर्डला राघव भैय्यासाहेब खोळंबे याचे जन्माची नोंद आढळून आली नाही त्यामुळे अर्जदारास मुलगा राघव याचा जन्माचा दाखला मिळाला नाही. ग्रामपंचायत वडाळा बहिरोबा तसेच पंचायत समिती, तहसिलदार साहेब नेवासा यांचेकडे राघव भैय्यासाहेब खोळंबे याचे जन्माची नोंद आढळून आली नाही व त्यांनी जन्माचा दाखला देण्यास नकार दिला तसेच जन्म नोंदीबाबत ग्रामपचांयत वडाळा बहिरोबा यांनी जन्माची नोंद नसल्याचा दाखला अर्जदार यांना दिनांक २१/१०/२०२६ रोजी दिला. त्यामुळे अर्जदार यांना मे. कोर्टातुन जन्माचा दाखला मिळण्याबाबतचा आदेश व्हावा म्हणून सदरचा अर्ज मे. कोर्टात

त्या अर्था सदरील वादासंबंधीत कोणाचेही काही एक म्हणणे किंवा कोणाची काही एक हरकत असेल तर या जाहिर नोटीस प्रसिध्द झाले तारखेपासुन एक महिण्याच्या आत दि. ०२/१२/२०२६ पर्यंत या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रांनिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकुम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/११/२०२६ रोजी माझी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा
नेमलेली तारीख : ०२/१२/२०२६

तयार करणार कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
नेवासा

हुकुमावरुन
सहा. अधिक्ष
सह दिवाणी न्यायालय क स्तर नेवासा

शिक्का

पान १ वरुन

जिल्हा बँकेचा अध्यक्ष कोण...

आठ संचालक आहेत. त्यामुळे पक्षांतर्गत दावेदारीत आमदार मोनिका राजळे, डॉ. सुजय विखे पाटील आणि बिपीन कोल्हे यांची नावे आघाडीवर आहेत. मात्र, अजित पवार राष्ट्रवादीचे आमदार आशुतोष काळे आणि ठाकरे सेनेचे माजी मंत्री शंकरराव गडाख यांचीही नावे अध्यक्षपदासाठी चर्चेत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस भाजपच्या वाट्याला अध्यक्षपद ठेवतात की मित्रपक्षाला संधी देत राजकीय समन्वय साधतात, याची उत्सुकता आहे.

बँकेच्या २१ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत विखे-थोरातांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवत सहकार विकास पॅनेलच्या माध्यमातून एकत्रित ताकद दाखविली. बिनविरोध झालेल्या ११ जागांपैकी १० जागा, तर निवडणूक झालेल्या १० जागांपैकी सात जागा या पॅनेलने जिंकल्या. त्यानंतर संजीवनी शिंदे-गायकर यांनीही पाठिंबा दिल्याने या गटाचे संख्याबळ १८ वर पोहोचले आहे. विरोधात विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे दोन समर्थक आणि खासदार नीलेश लंके असे तीन संचालक आहेत.

विशेष म्हणजे, या १८ संचालकांपैकी १३ संचालक थोरात गटाचे, तर पाच संचालक विखे गटाचे आहेत. त्यामुळे भाजपचे आठ संचालक असले, तरी प्रत्यक्ष सत्तेच्यासमीकरणात थोरात गटाची भूमिकाही निर्णायक ठरणार आहे. हीच बाब अध्यक्ष निवडीत महत्त्वाची ठरू शकते.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांतील राजकीय कटुता बाजूला ठेवून विखे-थोरातांनी सहकारासाठी हातमिळवणी केली. मात्र, आता अध्यक्षपदाच्या निवडीत या सहमतीची खरी परीक्षा होणार आहे. मुख्यमंत्री फडणवीसांचा निर्णय, थोरात गटाची भूमिका आणि मित्रपक्षांची महत्त्वाकांक्षा या तीन बाबींवर जिल्हा बँकेच्या सत्तेचे पुढील राजकारण ठरणार आहे. त्यामुळे १२ नोव्हेंबरची बैठक केवळ पदाधिकाऱ्यांची निवड न राहता जिल्ह्याच्या आगामी राजकीय समीकरणांची दिशाही निश्चित करणारी ठरण्याची शयता आहे.

गोकुळचा फॉर्म्युला सतेज पाटलांनीच द्यावा; मुश्रीफांची ऑफर!

गुंतागुंतीचा झाला आहे.दरम्यान, राज्य सरकारने गोकुळवर पाच शासननियुक्त संचालक नेमण्याचा निर्णय घेतला असून, त्यापैकी चौघांना मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे सत्तेचे गणित बदलण्याची शयता निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर मुश्रीफ यांनी सतेज पाटील यांच्यावरच तोडगा काढण्याची जबाबदारी सोपविल्याचे चित्र आहे. आता सतेज पाटील कोणता फॉर्म्युला मांडतात आणि महाविकास आघाडी त्याला कसा प्रतिसाद देते, याकडे कोल्हापूरच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

कौटुंबिक त्रासातून तरुणाची नदीत उडी; दोन दिवसानंतर मृतदेह सापडला

मागणी करुन नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी दिली. या घटनांमुळे सतीष हे प्रचंड मानसिक तणावाखाली आले होते. दरम्यान त्याच दिवशी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास सतीष यांनी धानोरे गावाच्या शिवारातील चणेगाव बंधाऱ्यावरून प्रवरा नदीत उडी मारली. १९ ऑटोबर रोजी सकाळी ११ वाजता घटनास्थळापासून सुमारे ३०० मीटर अंतरावर नदीपात्रात त्याचा मृतदेह आढळून आला.

या प्रकरणी मयत सतीष वाणी यांची आई प्रमिला आप्पासाहेब वाणी यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी पत्नी- शितल सतीश वाणी, मेव्हणा- संदीप सुनिल तांबे, सासरे- सुनिल सिताराम तांबे, सासु- मंगल सुनिल तांबे, सर्व रा. दुर्गापुर ता. राहाता तसेच सुरज कुरकुटे, दादा कुरकुटे, दोघे रा. लोणी बुद्रुक, ता. राहाता आणि साडु- शिवाजी शिंदे, मेव्हणी- रेणुका शिवाजी शिंदे, दोघे रा. समनापुर, ता. संगमनेर, या आठ जणांवर गुन्हा रजि. नं. १२२५ भारतीय न्याय संहिता कलम १०८, ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५) प्रमाणे आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

संगमनेरच्या बाजारपेठेत १६० कोटींची उलाढाल

संगमनेर : अहमदनगर जिल्ह्यातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या संगमनेर शहरात यंदा दिवाळीनिमित्त मोठी आर्थिक उलाढाल झाली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखालील अमृत उद्योग समूह आणि तालुक्यातील विविध संलग्न सहकारी संस्थांच्या माध्यमातून सुमारे १६० कोटी रुपयांहून अधिक रक्कम बाजारपेठेत आल्याने शहरातील व्यापाराला मोठी चालना मिळाली आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढल्याने व्यापारी वर्गात आनंदाचे वातावरण आहे. मागील काही काळातील अस्थिर वातावरणामुळे संगमनेरच्या बाजारपेठेतील व्यापारावर परिणाम झाल्याचे चित्र होते. संगमनेरच्या बाजारपेठेवर आजूबाजूच्या तालुक्यांतील नागरिकांचाही मोठा विश्वास आहे. मात्र, विविध कारणांमुळे बाहेरील ग्राहकांची वर्दळ कमी झाल्याने व्यापारी चिंतेत होते. यंदा दिवाळीच्या निमित्ताने बाजारपेठेत पुन्हा उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. अमृत उद्योग समूहातील सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून २२ कोटी रुपये, राजहंस दूध संघातून ५० कोटी रुपये, दूध संघाशी संलग्न दूध संस्थांमधून सुमारे ५५ कोटी रुपये बाजारात आले आहेत. याशिवाय अमृतवाहिनी शैक्षणिक संस्था, अमृतवाहिनी बँक, शेतकी संघ, सह्याद्री, राजहंस कंपनी तसेच विविध सेवा सोसायट्या, दूध संस्था, शैक्षणिक संस्था, बँका आणि पतसंस्थांच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाले आहेत. या सर्व संस्थांमधून मिळून सुमारे १६० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम बाजारपेठेत आल्याचे सांगण्यात येते.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

शनिवार दि. ७ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

२ | १५६, २४६, ६६० | ९ | २७०, ४५०, १४४ | ३ | १२०, ६७०, ३८० | ४८८

६२-२४-१९-९०-७३-३८

कल्याण
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

५ | २३०, २५०, १२२ | ७ | १२४, १७९, ७०० | ४ | १३०, १४९, ४४६ | ४८

८५-५१-२७-७९-६४-४०

मुंबैम (मेन)
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

३ | २३८, ४९०, ६७० | ४ | १३०, ३३८, ४०० | ० | १९०, २८०, २४४ | ८८

७३-३१-९४-४५-६०-८०

माधुरी बाजार डे / नाईट

२६७, ३८९, ०१६० | ५- ५४ | ७८०, ५५४, ४७९५ | ४०-, ५०-२८-२४

२-६-०

dpbosssss.live

अत्याधुनिक स्वीपर मशीनमुळे कोपरगाव होणार धुळमुक्त,

महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करून कोपरगाव धुळमुक्त आणि सुंदर करण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेने अत्याधुनिक स्वीपर मशीन उपलब्ध करून दिली आहे. या मशीनच्या माध्यमातून रस्त्यांवरील धूळ आणि कचऱ्याचे संकलन केले जाणार असून, शहराच्या स्वच्छतेला अधिक गती मिळणार आहे. 'स्वच्छ कोपरगाव, सुंदर कोपरगाव' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी नगरपरिषदेने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी सांगितले.

कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने खरेदी करण्यात आलेल्या या अत्याधुनिक स्वीपर मशीनचा शुभारंभ गुरुवार (दि. ५) रोजी श्री साईबाबा कॉर्नर येथे स्नेहलताताई कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मशीनचे विधिवत पूजन करून स्वच्छता मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी नगराध्यक्ष पराग संधान यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.



विकासासाठी राजकारण बाजूला ठेवावे

शहर आणि तालुक्याच्या विकासाच्या बाबतीत दोन्ही आमदारांनी टोकाचे राजकारण न करता शहराच्या हितासाठी एकत्रितपणे काम करावे. विकासकामांसाठी सर्वांनी सकारात्मक भूमिका घ्यावी. या उपक्रमामुळे कोपरगाव शहर धुळमुक्त करण्याचा आमचा संकल्प पूर्णत्वास जाण्यास मदत होणार आहे, असे स्नेहलताताई कोल्हे यांनी सांगितले.

यापूर्वी शहरातील रस्त्यांची स्वच्छता पारंपरिक पद्धतीने झाडू मारून केली जात होती. त्यामुळे रस्त्यांवरील धूळ हवेत पसरून नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन नगरपरिषदेने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला. नव्या मशीनडरे रस्त्यांवरील धूळ आणि कचरा संकलित केला जाणार आहे. त्यामुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कामाला मदत होऊन शहरातील स्वच्छता अधिक प्रभावीपणे राखता येणार आहे.

यावेळी शहराच्या स्वच्छतेसाठी मेहनत घेणाऱ्या महिला व पुरुष स्वच्छता कर्मचाऱ्यांचा स्नेहलताताई कोल्हे आणि नगराध्यक्ष पराग संधान यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

नगराध्यक्ष पराग संधान म्हणाले की, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिन कोल्हे, स्नेहलताताई कोल्हे आणि आ. विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव शहर धुळमुक्त करण्याचा संकल्प पूर्णत्वास नेला जात आहे. नगरपरिषद निवडणुकीत शहरवासीयांना दिलेला शब्द पूर्ण करताना समाधान वाटत असून, अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

याप्रसंगी स्नेहलताताई कोल्हे यांनी श्री साई तपोभूमी येथे दर्शन घेतले. तसेच वसुबारसेनिमित्त गोमातेला चारा अर्पण केला. यावेळी मुख्याधिकारी अजित निकत, आरोग्य सभापती वैभव आढाव, सर्व नगरसेवक, नगरसेविका, नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

आधीतील डॉक्टरांकडून ज्येष्ठ वैद्यकीय सेवक डॉ. गुणे दाम्पत्याचा सन्मान

धन्वंतरी दिनी सपत्नीक पूजन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

आधी :धनत्रयोदशी आणि धन्वंतरी दिनाचे औचित्य साधून आश्वी पंचक्रोशीतील डॉक्टरांनी एकत्र येत आगळावेगळा उपक्रम राबविला. परिसरातील ज्येष्ठ वैद्यकीय सेवक डॉ. श्रीराम मनोहर गुणे आणि त्यांच्या पत्नी सौ. मंजिरी गुणे यांचे सपत्नीक पूजन करून त्यांच्या कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी उपस्थित डॉक्टरांनी त्यांचे आशीर्वाद घेतले. आश्वी पंचक्रोशीतील ग्रामीण भागात अनेक वर्षांपासून वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉ. गुणे यांनी केवळ रुग्णांवर उपचार न करता सेवाभावी वृत्तीने वैद्यकीय क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. रुग्णांप्रती संवेदनशीलता, निस्वार्थ सेवा, डॉक्टरांमधील परस्पर स्नेह आणि व्यावसायिक क्षेत्रातील नैतिक मूल्यांचे महत्त्व त्यांनी आपल्या कार्यातून जपले. त्यांच्या कार्यातून मिळालेले संस्कार आणि विचार आमच्यासाठी प्रेरणादायी असल्याची भावना उपस्थित डॉक्टरांनी व्यक्त केली.

धन्वंतरी दिनी धन्वंतरी पूजनासोबतच समाजासाठी आयुष्यभर आरोग्यसेवा देणाऱ्या ज्येष्ठ डॉक्टरांचा सन्मान करण्याचा उपक्रम विशेष ठरला. संपत्तीच्या पूजेपेक्षा समाजाच्या आरोग्यासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा आदर आणि कृतज्ञता व्यक्त करणे महत्त्वाचे असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. ज्येष्ठ डॉक्टर अनिल कस्तुरे, डॉ. दिनकर गायकवाड आणि डॉ. अनिल बालोटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी डॉ. चंदाराणी मदने, डॉ. काळेबाग, डॉ. गीते, डॉ. वीरेश भोसले, डॉ. अभिजित गायकवाड, डॉ. गणेश गायकवाड, डॉ. सचिन गागरे, डॉ. विवेक उंबरकर, डॉ. जोंधळे, डॉ. समीर शेख, डॉ. डोखे, डॉ. प्रणव गुणे, डॉ. अमेय गुणे यांच्यासह पंचक्रोशीतील डॉक्टर उपस्थित होते.

ज्येष्ठांचा आदर, सेवेचा सन्मान आणि वैद्यकीय क्षेत्रातील नैतिक मूल्यांची जपणूक असा त्रिवेणी संगम साधणारा हा उपक्रम आश्वी परिसरासाठी प्रेरणादायी ठरला.

पाणीटंचाई रोखण्यासाठी आ. प्रशांत बंब सरसावले

अधिकाऱ्यांना कामाचा अल्टिमेटम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : गंगापूर व खुलताबाद तालुक्यांतील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आमदार प्रशांत बंब यांनी प्रशासनाला आतापासूनच नियोजनबद्ध काम करण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांना पिण्याचे पाणी, पशुधनाला चारा-पाणी आणि विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून द्याव्यात. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून जनतेच्या समस्या सोडवाव्यात, अशा सूचना त्यांनी गंगापूर येथे झालेल्या पाणीटंचाई आढावा बैठकीत दिल्या.

बैठकीत दोन्ही तालुक्यांतील पाणीपुरवठा, उपलब्ध जलसाठा, संभाव्य टंचाई आणि टँकर नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा गावनिहाय उपाययोजना आताच निश्चित कराव्यात, असे बंब यांनी स्पष्ट केले. नागरिकांना शासकीय कामांसाठी वारंवार कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून सेवा द्यावी, असेही त्यांनी बजावले.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्धतेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी शेती महामंडळाची जमीन काही दिवसांसाठी चारा उत्पादनाकरिता उपलब्ध करून घेण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. पशुवैद्यकीय विभागाकडे ज्वारीचे बियाणे उपलब्ध असून, शेतकऱ्यांनी चारा उत्पादनासाठी पुढाकार घ्यावा. प्रशासनानेही त्यांना मार्गदर्शन करावे, अशा सूचना देण्यात आल्या.

गावातील नागरिकांसह पशुधनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध राहील, याची जबाबदारी ग्रामसेवक व पाणीपुरवठा विभागाने घ्यावी. मुख्य गावासह दूरवरील वस्ती-वाड्यांमध्येही पाण्याच्याटाक्या उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच रोजगार हमी योजनेतून जलसंधारणाची कामे हाती घेऊन त्यांना गती द्यावी. यातून स्थानिकांना रोजगार आणि भविष्यासाठी पाणीसाठा निर्माण होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.



ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी १०८ सायकलींचे वाटप करण्यात आले असून, आवश्यक पुस्तके उपलब्ध करून देण्याचे कामही सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. बैठकीला जिल्हा परिषद समाजकल्याण समितीचे सभापती बालाजी सोनटक्के, नगराध्यक्ष संजय जाधव, उपजिल्हाधिकारी डॉ. अरुण ज-हाड, तहसीलदार नवनाथ वाघवाड, गटविकास अधिकारी सुहास वाघचौरे, मुख्याधिकारी संतोष आगळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते. कागदोपत्री नियोजन न करता प्रत्यक्ष कामांना गती देऊन नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन आमदार बंब यांनी केले.

सानुग्रह अनुदानाअभावी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

भोकर : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिवाळीचे सानुग्रह अनुदान न मिळाल्याने पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे ऐन सणासुदीच्या काळात गावातील नळपाणीपुरवठा ठप्प झाला असून ग्रामस्थांना कृत्रिम पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. ग्रामपंचायतीतील अंतर्गत वादाचा फटका आता थेट ग्रामस्थांना बसत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

ग्रामपंचायत कर्मचारी अनेक वर्षांपासून सेवेत असून दरवर्षी दिवाळीनिमित्त त्यांना सानुग्रह अनुदान व कपडे दिले जात होते. यंदा मात्र हे लाभ न मिळाल्याने कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कार्यालयीन वेळेनंतरही काम करावे लागते. सुट्ट्याही मिळत नाहीत. अशा परिस्थितीत सणासाठी सानुग्रह अनुदान मिळावे, अशी त्यांची मागणी आहे.

सरपंच शीतल पटारे यांनी सांगितले की, कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यास आमचा विरोध नाही. तातडीच्या बैठकीत चर्चा करून आठ ते दहा हजार रुपये देण्याचे निश्चित केले असून त्यानुसार धनादेशही तयार केले आहेत. मात्र, ग्रामपंचायत अधिकारी नियमांचे कारण पुढे करून निर्णय घेण्यास तयार नसल्याने अडचण निर्माण झाली आहे. याबाबत ग्रामपंचायत अधिकारी हितेश ढुमणे यांनी, नियमबाह्य काम करणार नसल्याचे स्पष्ट केले. मासिक बैठकीत या विषयावर एकमत झालेले नाही. कर्मचाऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे अर्ज केले असून त्यावर सरपंचांनीही स्वाक्षरी केली आहे. नियमात न बसणारा निर्णय कसा घ्यायचा, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ग्रामपंचायतीतील सरपंच, उपसरपंच, अधिकारी व सदस्यांमधील अंतर्गत वादामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. वरिष्ठ प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून तोडगा काढावा आणि पाणीपुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

वाड्या वस्त्यांवरील शाळकरी मुलींना सायकलींचे वाटप ; आ. बंब यांचा उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : गंगापूर आणि खुलताबाद तालुक्यातील दुर्गम वाड्या-वस्त्यांवरील विद्यार्थिनींची शाळेत जाण्या-येण्याची अडचण दूर करण्यासाठी आमदार प्रशांत बंब यांच्या वतीने सायकल वाटपाचा स्तुत्य उपक्रम गुरुवारी (दि. ५) रोजी राबविण्यात आला. आमदार बंब यांच्या गावदौऱ्यादरम्यान त्यात त्या गावातील वाड्या वस्त्यावरील विद्यार्थिनींनी दररोजच्या तीन ते चार किमीवर करावी लागणारी पायपीटीच्या मांडलेल्या अडचणींची दखल घेत गंगापूर तालुक्यातील कोबापूर, भोयगाव तर खुलताबाद तालुक्यातील टाकळी राजेराय येथील वाड्या-वस्त्यांवरील विद्यार्थिनींना गंगापूर येथील शिवकृपा मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात तब्बल १२८ सायकलींचे वाटप करण्यात आले.

गंगापूर आणि खुलताबाद तालुक्यातील अनेक वाड्या-वस्त्यांवर शाळेत जाण्यासाठी सरकारी अथवा खासगी वाहतुकीची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थिनींना दररोज तीन ते चार किलोमीटरचा प्रवास पायी करावा लागत होता. शाळेत जाण्यासाठी करावी लागणारी ही पायपीट त्यांच्या वेळेचा आणि श्रमांचा अपव्यय करणारी ठरत होती. गावदौऱ्यादरम्यान काही शाळकरी मुलींनी ही अडचण आमदार प्रशांत बंब यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर या समस्येवर ठोस उपाय म्हणून त्यांच्या वतीने सायकल वाटपाचा उपक्रम हाती घेण्यात आला.

या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना शाळेत



येऱ्या करण्यासाठी सोयीचे साधन उपलब्ध झाले असून, त्यांच्या प्रवासाचा वेळ आणि श्रम वाचणार आहेत. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील मुलींच्या शिक्षणातील अडथळे दूर करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.विद्यार्थिनींची शाळेपर्यंतची पायपीट थांबवून त्यांच्या शिक्षणाच्या स्वप्नांना नवी गती देण्याचा आमदार प्रशांत बंब यांचा हा उपक्रम पालक आणि विद्यार्थिनींसाठी दिलासादायक ठरत आहे.दरम्यान यावेळी किशोर धनायत, प्रदीप पाटील, मारुती खैरे ,भागेश गंगवाल, आबासाहेब शिरसाठ, विजय पानकडे, आनंद पाटील, राकेश कळसकर, रवींद्र चव्हाण, सुरेश शिंदे, सोपान भेंडे, विकास कापसे, परसराम बारगळ, अतुल रासकर, प्रशांत मुळे, अमोल जाधव, दीपक साळवे, गणेश शिंदे, संदीप बोचवारे, कृष्णकांत व्यवहारे, युवराज कसबे, सतीश डेडवाल, संदीप पवार, भारत पाटील, आदर्श फाउंडेशन, विद्यार्थी पालक, भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

निधनवार्ता

शिवाजी होन



नेवासा : तालुक्यातील शिरेगाव येथील शिवाजी सोपानराव होन (वय ४४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. व्यवसायाने लॅब टेक्निशियन म्हणून कार्यरत होते.

त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, एक भाऊ, तीन बहिणी असा मोठा परिवार आहे. ते मुळा एज्युकेशन निंभारी हायस्कूलचे क्लार्क दादा पाटील होन यांचे बंधू व काकासाहेब पवार यांचे मेव्हणे होत.

मच्छिंद्र दिघे



माळवाडगाव : श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव येथील प्रगतशील शेतकरी मच्छिंद्र रघुनाथ दिघे (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी,दोन मुले, सुना, नातवंडे भाऊ, भावजयी, पुतणे,असा परिवार आहे. मुठेवाडगाव ग्रामपंचायत माजी उपसरपंच उज्वला आदिनाथ दिघे यांचे सासरे तर आदीनाथ व नारायण दिघे यांचे ते वडील होत.

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
27/07/2026 to 31/07/2026	25 59 60 55 50	59 59 00 42 22 28	35 38 62 39 00	40 00 47 89 00	16 00 70 48 88
03/08/2026 to 07/08/2026	23 34 90 56 99	17 17 00 85 15 19	33 38 42 12 99	46 00 09 47 88	37 70 05 34 48
10/08/2026 to 14/08/2026	57 77 99 23 34	23 23 00 53 14 18	25 25 00 70 23 55	35 55 39 13 55	13 33 76 35 58
17/08/2026 to 21/08/2026	24 40 60 46 00	27 27 78 73 34 46	11 16 82 48 00	15 56 23 77 99	44 49 77 17 79
24/08/2026 to 28/08/2026	36 60 96 79 00	25 25 55 23 22 99	78 89 42 23 77	45 50 98 44 00	26 66 41 29 90
31/08/2026 to 04/09/2026	14 49 43 67 00	17 17 00 81 56 00	15 59 52 33 36	69 90 50 23 55	57 77 99 13 35
07/09/2026 to 11/09/2026	68 80 47 55 57	22 22 28 27 12 24	57 57 00 26 35 58	11 12 43 77 99	44 45 33 68 89
14/09/2026 to 18/09/2026	78 89 47 12 24	33 33 36 20 13 36	79 99 56 17 78	68 80 42 34 55	39 99 16 79 90
21/09/2026 to 25/09/2026	39 90 25 34 48	45 45 57 62 12 29	48 80 23 59 99	16 66 30 47 99	15 50 60 28 80
28/09/2026 to 02/10/2026	66 69 19 13 35	13 13 37 18 27 79	26 60 84 25 57	66 60 29 12 66	36 69 84 77 70
05/10/2026 to 09/10/2026	14 40 57 25 00	45 45 99 85 16 88	13 30 48 56 67	46 99 99 12 66	55 58 84 59 00
12/10/2026 to 16/10/2026	16 00 79 56 88	29 20 11 66 99	12 12 58 18 99	13 30 46 12 33	25 57 42 48 00

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
१७९	४६८
७७	८२
१२४	१५६

Mydpboss.com

रोहित पठारे हत्या प्रकरणी पालकमंत्र्यांची पोलिसांना चपराक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : रोहित पठारे हत्या प्रकरणातील पोलिसांच्या कार्यपद्धतीवर पीडित कुटुंबीयांनी गंभीर प्रश्न उपस्थित केल्यानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी शुक्रवारी पोलिसांची चांगलीच कानउघाडणी केली. कुटुंबीयांनी पोलिसांविरोधात केलेल्या तक्रारींचा तपशील ऐकून शिरसाठ यांनीही आश्चर्य व्यक्त केले. तपासातील दिरंगाई आणि गुन्हे नोंदविण्याच्या प्रक्रियेतील हलगर्जीपणाबद्दल त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. दुसरीकडे, दुःखाच्या प्रसंगी कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा म्हणून त्यांनी आपल्या विभागाकडून पाच लाख रुपयांची तातडीची आर्थिक मदत जाहीर केली.

रोहितच्या घरी भेट दिल्यानंतर पालकमंत्र्यांनी कुटुंबीयांशी सविस्तर संवाद साधला. यावेळी नातेवाइकांनी पोलिसांच्या कामकाजाबाबत अनेक तक्रारी मांडल्या. फिर्याद देण्यासाठी गेल्यानंतर दोन-दोन दिवस पोलीस ठाण्यात बसवून ठेवले जाते, मात्र वेळेत गुन्हा दाखल केला जात नाही, अशा स्वरूपाच्या तक्रारी करण्यात आल्या. या सर्व बाबी ऐकल्यानंतर



शिरसाठ यांनी पोलिसांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

'तुमच्याकडून हलगर्जीपणा झालेला आहे, हे लक्षात घ्या. अशा प्रकारे तपास केला जात नाही. फिर्यादी कोण आहे आणि समोरचा कोण आहे, याचा विचार न करता गुन्हा नोंदविणे ही पोलिसांची पहिला कर्तव्य आहे. दोन-दोन दिवस फिर्यादीला बसवून ठेवता आणि गुन्हा नोंद करीत नाही, हे काय चालले आहे?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

रोहितचा मृत्यू झाल्यानंतरही परस्परविरोधी दाखल झालेल्या गुन्ह्यांचा विचार करण्यात पोलिसांनी वेळ घालवल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला. 'एका माणसाचा जीव गेला तरी

कुटुंबीयांना ५ लाखांची मदत

तुम्ही परस्परविरोधी गुन्हे बघत बसलात. तुम्हाला मेलेल्या माणसाला अटक करायची होती का ? काय करता तुम्ही असे ?' अशा शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

पोलिसांनी कोणत्याही एका गटाची बाजू घेण्याऐवजी सत्याच्या आधारावर तपास करणे अपेक्षित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'आपल्याला कोणाचीही बाजू घ्यायची नाही. जे सत्य आहे ते समोर आले पाहिजे. पीडित कुटुंबीय सार्वजनिकपणे इतके गंभीर आरोप करीत आहेत, त्यांच्या भावनाही समजून घेतल्या पाहिजेत,' असेही त्यांनी बजावले.

दरम्यान, रोहितच्या मृत्यूमुळे कुटुंबावर कोसळलेल्या संकटात त्यांना तातडीचा आर्थिक आधार मिळावा, यासाठी पालकमंत्र्यांनी त्यांच्या विभागाकडून पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली. या प्रकरणात कोणावरही अन्याय होऊ नये, मात्र तपासात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी पोलिसांना तातडीने तपासाला गती देण्याचे निर्देश दिले. यावेळी खासदार संदीपान भुमरे, आमदार रमेश बोरणारे, माजी उपनगराध्यक्ष साबेर खान राजेंद्र साळुंके आदी उपस्थित होते.

टंचाईग्रस्त भागातील लोकांना पुण्याच्या आनंद यात्री मंडळाकडून फराळाचे वाटप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : तालुक्यात सध्या तीव्र दुष्काळी परिस्थिती असून दिवाळी सणाचा कोठेही फारसा उत्साह जाणवत नाही. हाता तोंडाची लढाई अहोरात्र लढत काबाडकष्ट करणाऱ्या लोकांचे तोंड गोड करण्याच्या उद्देशाने पुण्याच्या आनंद यात्री मित्रमंडळाने दिवाळीच्या फराळाचे वाटप केले. आनंदाचे डोही, आनंद तरंग अशा रचनेप्रमाणे गोरगरीब लोकांच्या चेहऱ्यावर घटकावर हास्य फुलले.

पुण्याचे राम चिंचणीकर व शुभदा ताकभाते यांच्या पुढाकाराने फेसबुकवरच्या सुमारे १४००० मित्र-मैत्रिणींचे मंडळ आहे. विधायक सामाजिक उपक्रम करत सेवा कार्याचा आनंद अशा मित्रांकडून मिळवला जातो. आनंदी, समाधानी व सेवाभावी समूह जीवनासाठी या मंडळाकडून जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. पाथर्डी चे भूमिपुत्र तथा या मंडळाचे सदस्य नितीन अदवंत यांनी मंडळापुढे तालुक्यातील तीव्र दुष्काळी परिस्थिती मांडली. त्यानंतर प्रातिनिधिक स्वरूपात दुष्काळग्रस्त भागात दिवाळीचा फराळ वाटप करण्याचा निर्णय घेत मंडळातर्फे मंदार पाठक व अविनाश फंड पाथर्डी दाखल झाले. माजी नगरसेवक बंडू पाटील बोरुडे, हाजी हुमायून भाई आतार, दिगंबर गाडे, यांच्याशी चर्चा करत शहरातील पगारे वस्ती, मातंग वस्ती तालुक्यातील सर्वाधिक टंचाईग्रस्त असणाऱ्या माणिकदौंडी परिसरातील व रांजणी येथील



भिल्ल वस्ती येथे फराळाचे वाटप केले. बाजार समितीतील हमाल, मापाडी यांनाही आंबेडकर भवन मध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करत फराळाचे वाटप करण्यात आले. आनंद यात्रींची यात्रा खऱ्या अर्थाने चिंताग्रस्त गोरगरिबांना आनंद देणारी ठरली. ऊस तोडणी कामगार, कोळसा कामगार, असा वर्ग तालुक्यात अधिक आहे.

यंदा उसाचे उत्पादनही समाधानकारक नसल्याने तोडणी कामगारांच्या हाताला पुरेसे काम नाही. तीव्र महागाईमुळे जगण्याची लढाई हीच आता अस्तित्वाची लढाई झाली आहे. दुर्गम डोंगराळ भागात तर आजच जगण्याचा प्रश्न भेडसावत आहे. बऱ्याच गावांमध्ये दिवाळीचा सण केवळ मुलाबाळांसाठीच ओढून ताणून साजरा केला जात आहे. ग्रामीण भागात तर जनावरे जगण्यासाठी व पोटाला दोन घास मिळावेत यासाठी स्थलांतर अटळ आहे. अशा परिस्थितीत टंचाईग्रस्तांना शक्य ती सर्व प्रकारचे सहकार्य करण्यासाठी विविध संघटना व कार्यकर्ते सरसावल्याचे आशादायक चित्र निर्माण झाले आहे.

डोळ्यापुढे आलेल्या दिवाळीच्या सणाने काही कुटुंबातील चिंता क्षणभर कमी करता आली, याचा आम्हाला आनंद वाटतो. दुष्काळी जनतेच्या रुपात ईश्वर पाहून आम्हाला त्याची सेवा करण्याची संधी मिळाली, यात आनंद यात्री धन्यता मानतात. दुष्काळाचे संकट दूर होऊन सर्वांना सुख लाभावे अशा शब्दात आनंद यात्रेच्या प्रतिनिधींनी भावना व्यक्त केल्या. रांजणी येथील भिल्ल वस्तीतील काही महिलांचे डोळे मदतीच्या या भावनेने पाणावले. आमचे जाऊ द्या, आमच्या लेकरांचे तोंड गोड झाले, याचा आम्हाला खूप आनंद वाटतो. परमेश्वर तुम्हाला खूप आयुष्य देवो अशा शब्दात वस्तीवरील महिलांनी भावना व्यक्त केल्या.

पाथर्डी येथील आंबेडकर भवन मध्ये हमाल मापाडी यांना समारंभपूर्वक शिधा वाटप करण्यात आले .यावेळी महेंद्र राजगुरू, जावेद भाई पठाण, बाळासाहेब सोनटक्के, सिताराम बोरुडे यासह कार्यकर्ते उपस्थित होते. दिगंबर गाडे यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले.

सर्वांना सोबत घेऊन जाणार नेतृत्व विठ्ठल आण्णांच्या रूपाने हरपल



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

हातगाव : विठ्ठल आण्णा अभंग यांनी सरपंचपदी असताना गावच्या विकास कामाबरोबरच गावातील असंख्य नागरिकांच्या सुख दुःखात कायम सहभागी होऊन सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केलेला आहे असे मत हातगावातील अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे. शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील माजी सरपंच व तंटा - मुक्तीचे अध्यक्ष तसेच श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक विठ्ठल भाऊराव अभंग यांचे नुकतेच ऱ्हायविकारच्या तीव्र झटक्याने निधन झाले असून त्यांच्या निधनाबद्दल ग्रामस्थांनी सर्वपक्षीय शोक सभेचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालयासमोर आयोजित करण्यात आले होते त्या वेळी अनेक ग्रामस्थांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. यावेळी बद्रीनाथ बर्गे, संजय मातंग, संजय गलांडे, बाळासाहेब देशमुख, पत्रकार रावसाहेब निकाळजे, संतोष भराट, अरुण मातंग, कासमभाई शेख यांनी आपले विचार व्यक्त करून विठ्ठल अभंग यांच्या जीवन चरित्राबाबतच्या भावना बोलून दाखवल्या या संभेसाठी शिवनाथ अभंग, बंडू घुले, बंडू हागे, गोरख कदम, शंकर भराट, रवी गायकवाड, राजेंद्र अकोलकर, काकासाहेब कराळे यांच्यासह ग्रामविकास अधिकारी संजय दारुणकर त्यांचे सर्व कर्मचारी व असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महसूल कर्मचाऱ्यांच्या कथित त्रासाला कंटाळून शेतकऱ्याचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जमीन व्यवहारातील कथित फसवणूक, लाचखोरी तसेच महसूल विभागातील कर्मचाऱ्यांकडून होत असलेल्या त्रासाला कंटाळून पाथर्डी तालुक्यातील कुत्तरवाडी येथील शेतकरी अंबादास दादाबा गायकवाड यांनी इतर १५ व्यक्तींसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. आपल्या विविध मागण्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या उपोषणात शेतकरी अंबादास दादाबा गायकवाड यांच्यासह वसंत खेडकर, बाबुराव खेडकर, केशव खेडकर, विष्णू खेडकर, देविदास खेडकर आदींसह कुटुंबातील महिला शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या आहेत.

निवेदनात नमूद केल्यानुसार,



कुत्तरवाडी येथील जुना सर्व्हे क्रमांक २२६ आणि नवीन सर्व्हे क्रमांक ६६/१/अ/१ मधील जमिनीवर अर्जदार गेल्या ५५ वर्षांपासून वहीत करीत आहेत. सदर जमीन अर्जदारांना देण्याबाबत तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांनी लेखी आदेश दिले असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, महसूल विभागातील क्लार्क भगवान सानप यांनी जमीन देण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच विश्वेश्वर खेडकर यांनी अन्य व्यक्तींना सोबत घेऊन दमदाटी केल्याचेही अर्जदारांनी म्हटले आहे.

याशिवाय, रस्त्यात अडवून अपमानास्पद तसेच जातिवाचक शब्दांचा वापर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनांमुळे झालेल्या मानसिक त्रासातून पत्नीला तीव्र मानसिक धक्का बसला आणि त्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याने तिचा मृत्यू झाल्याचा दुर्दैवी दावा अंबादास गायकवाड यांनी निवेदनात केला आहे.

फॉरेस्ट वर्ग-२ जमिनीच्या खरेदीचा मुद्दाही ऐरणीवर

कुत्तरवाडी शिवारातील दलित व मातंग समाजातील नागरिकांना मिळालेल्या फॉरेस्ट वर्ग-२ जमिनींच्या खरेदी-विक्रीचा मुद्दाही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. गट क्रमांक ६६/१/अ/३, ८५५/१ आणि ८५५/२ मधील जमिनींची नियमांचे उल्लंघन करून खरेदी करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित खरेदी व्यवहार रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांनी अहवाल पाठविला असल्याचे सांगण्यात आले; मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याची तक्रार अर्जदारांनी केली आहे.

संबंधित जमीन व्यवहारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, कथित लाचखोरी व दमदाटीच्या आरोपांची सखोल तपासणी करावी आणि फॉरेस्ट वर्ग-२ जमिनीच्या व्यवहारांबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अशा मागण्या उपोषणकर्त्यांनी केल्या आहेत.

समर्थ शैक्षणिक संकुलात दीपावली स्नेहमेळावा उत्साहात

सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, बेल्हे येथे दीपावलीच्या निमित्ताने समर्थ शैक्षणिक संकुलात आयोजित दीपावली स्नेहमेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. स्नेह, सद्भावना, सांस्कृतिक मूल्ये आणि संस्थात्मक एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या मेळाव्यामुळे संकुलात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. बळवंत महाराज आवटे (खजिनदार, श्री वारकरी प्रबोधन महासमिती, महाराष्ट्र तथा सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी, एम.टी.एन.एल., मुंबई) उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सचिव



विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके यांच्यासह संकुलातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व कर्मचारी उपस्थित होते.

दीपावलीच्या निमित्ताने समर्थ शैक्षणिक संकुलात यंदा आरोग्य, वाचन संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम साधणारे विविध उपक्रम राबविण्यात आले. समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या वतीने पारंपरिक आयुर्वेदिक संकल्पनेतून 'अभ्यंग उत्सव किट' तयार करण्यात आले होते. या उपक्रमाला संकुलातील सर्व विभागांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भारतीय परंपरा आणि आरोग्यविषयक जागरूकता यांची सांगड घालणारा हा उपक्रम विशेष ठरला. वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेला 'बौद्धिक दिवाळी फराळ' हा उपक्रमही लक्षवेधी ठरला. याअंतर्गत विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी विविध विषयांवरील ४० हून अधिक दिवाळी अंक वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आले होते.

५% निधीच्या माध्यमातून मिळणाऱ्या किराणा किट मुळे दिव्यांगाची दिवाळी गोडं : आ.अक्षय कर्डीले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून मिळणारा ५% निधी शेंडी ग्रामपंचायतीने किराणा किटच्या माध्यमातून खर्च केला यामुळे दिव्यांगच्या चेहऱ्यावर हसू निर्माण झाल्याचा आनंद हा काही वेगळा असतो त्याबद्दल नक्कीच शेंडी ग्रामपंचायतीचे मनापासून धन्यवाद देतं आमदार अक्षयदादा कर्डीले यांनी सर्व उपस्थिती कार्यकर्ते यांचे कौतुक केले.

प्रत्येक गावाने आपल्या स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून मिळणाऱ्या ५ टक्के निधीचा वापर करून गावातील दिव्यांग बंधू व भगिनीं यांना वस्तू स्वरूपात किंवा किराणा स्वरूपात वाटप करून प्रत्येकाच्या जीवनात आनंद देण्याचे काम करावे,तसेचं स्व.आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या माध्यमातून नेहमीच दिव्यांगानां प्राधन्याने लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत होते हे आवर्जून सांगितले.तसेचं दिव्यांगाचें



असणारे अडचणी व समस्या बाबत,महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.फडणवीस साहेब यांच्या पर्यंत लवकर माडणार आहें.हे यावेळी सांगितले. व सदर उपक्रमाचे कौतुक केले.असें उपक्रम प्रत्येक ग्रामपंचायतीने करून एक वेगळा आदर्श निर्माण करावा अशा आपल्या भाषणात आवर्जून सांगितले.व सर्वांना दिवाळी व पाडव्याच्या निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

आम्ही सदैव ग्रामपंचायतिच्या माध्यमातून गावातील दिव्यांग बंधू भगिनीं यांना सहकार्य करून प्रत्येक वर्षी निधीचे वाटप करून मदत करत असतो असं शेंडी ग्रामपंचायत सरपंच सौ. प्रयागा लोंढे यांनी सांगितले.

पर्यावरणाचा विचार न करता केलेल्या विकासामुळे देशाचे टाऊन प्लॅनिंग कोलमडले : पद्मश्री पवार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : भारताची मूळ परंपरा निसर्गाशी जोडलेली आहे. मात्र, पर्यावरणाचा कोणताही विचार न करता ओढे-नाले यांमध्ये अतिक्रमणे, नद्यांच्या पूररेषेचे उल्लंघन करून बांधकामे आणि विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व जंगलतोड सुरू आहे. त्यामुळे आपल्या देशाचे टाऊन प्लॅनिंग पूर्णपणे कोलमडले आहे, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाच्या विषयावर आयोजित बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी उपमहापौर ड. धनंजय जाधव, संजय गुगळे, कैलास दिघे, हर्षल आगळे, राजेंद्र पवार, प्रताप काळे, अमोल बागुल, राहुल मुथा



आदी उपस्थित होते.

पद्मश्री पोपटराव पवार पुढे म्हणाले की, पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या पुढाकारातून शहरात आतापर्यंत १५ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. मात्र, केवळ वृक्षलागवड करून चालणार नाही, तर दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या काळात लावलेली झाडे कशी जगवायची, याचे योग्य नियोजन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने लावलेले झाड जतन करून त्याला मुलाप्रमाणे सांभाळले पाहिजे. हेच आपल्या पुढील पिढीचे खरे भविष्य आहे. आपण मुलांच्या भविष्यासाठी त्यांच्या शिक्षणाची आणि नोकरीची स्वप्ने पाहतो. मात्र, पुढील पिढीचे भविष्यच अंधकारमय होणार असेल, तर त्या भविष्याचा विचार करून वृक्षांचे संगोपन करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. असे काम केल्यास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिप्रेत असलेले पर्यावरणपूरक कार्य आपल्या हातून घडेल.

पोपटराव पवार यांनी सातबारा संकल्पनेचा संदर्भ देत वृक्षांचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांनी जमीन महसूल पद्धतीचा अभ्यास केला. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जमीन महसूल पद्धत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या काळातील पद्धत आणि पेशव्यांच्या काळातील महसूल पद्धतीचा अभ्यास करण्यात आला. त्यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या काळात झाडांना पाण्याइतकेच महत्त्व दिले जात.

जाहीर नोटीस

श्री सिद्धीविनायक ग्रामीण बिगर शेती सहकार पतसंस्था मर्या., कर्जत, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर या संस्थेने कर्जदारांच्या थकबाकी पोटी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ मधील कलम १०१ अन्वये मिळविलेल्या वसूली प्रमाणपत्राचे आधारे कार्यवाही केल्यानंतर जप्त केलेल्या मालमतेचे अपसेट प्राईज मिळणेबाबतचे प्रस्ताव या कार्यालयाकडे दाखल केलेला असुन त्या अनुषंगाने संस्थेचे कर्जदार / जामीनदार यांना सुनावणी नोटीस रजिष्टर पोस्टाने पाठविण्यात आल्या होत्या व या कार्यालयामध्ये दिनांक २७/१०/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असून सदर सुनावणीस सदर कर्जदार/जामीनदार उपस्थित राहीलेले नाहीत. सबब त्यांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार पुढील सुनावणी दि. १८/११/२०२६ रोजी वर्तमान पत्रात देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. संस्थेचे खालील कर्जदार । जामीनदार गैरहजर राहिलेले असुन संस्थेने जप्त केलेल्या मालमतेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ. नं.	कर्जदाराचे नाव	गाव	कर्जाच्या अनुषंगाने जप्त केलेल्या मालमता धारकाचे नाव	स्थावर मालमता गाव	मिळकतीचे वर्णन सर्वे नं. / गट नंबर	क्षेत्र चौ.मी हे.आर
१	२	३	४	५	६	१
	श्री अरविंद असराजी रोकडे	कापरेवाडी, ता. कर्जत	श्री अरविंद असराजी रोकडे (कर्जदार)	कापरेवाडी, ता. कर्जत	गट नं. ४२/३	है. ३९ आर
			श्री शंकर राजेंद्र रोकडे (जामिनदार)	कोरेगाव, ता. कर्जत	गट नं. १०२४	हे. १० आर
			श्री सचिन असराजी रोकडे (जामिनदार)	कापरेवाडी, ता. कर्जत	गट नं. ४२/३	है. ७७ आर
०२	श्री एजाज रियाज सय्यद	दास्वाले गल्ली, कर्जत	श्री कांतीलाल छबा कदम (जामिनदार)	कापरेवाडी, ता. कर्जत	गट नं. ६२/१	है. ८० आर
०३	श्री गणेश ज्ञानदेव मुळे	शिक्षक कॉलनी, कर्जत	श्री गणेश ज्ञानदेव मुळे (कर्जदार)	मु.पो.ता. कर्जत	गट नं. ७६७/४२	१.८१.०५ आर
			श्री अमृत धनराज शेवाळे (जामिनदार)	मु.पो.ता.कर्जत	गट नं. ७५८/५२	१.६४.०० आर
०४	श्री अविनाश गोदड पठाडे	रा. पठारवाडी, ता कर्जत	श्री पोपट उत्तम पठाडे (जामिनदार)	कापरेवाडी, ता. कर्जत	गट नं. १२७०/६	१ है. १६ आर
०५	श्री भगवान पांडुरंग सुपेकर	कुळधरण	श्री भगवान पांडुरंग सुपेकर (कर्जदार)	कुळधरण	गट नं ७२४/१	है ५२ आर
			श्री अजय आण्णासाहेब सुपेकर (जामिनदार)	कुळधरण ता. कर्जत	गट नं. ३	है. ४२ आर
०६	श्री संदीप सिद्धेश्वर देशमुख	कर्जत	श्री संदीप सिद्धेश्वर देशमुख (कर्जदार)	कर्जत	गट नं. ५८४	१.१०.०० आर
			श्री रवी पांडुरंग पाटील (जामिनदार)	कर्जत	गट नं. ७८५ गट नं. ८०४	००,०५,०० आर है. ४० आर

सबब या जाहीर नोटीसी अन्वये सर्व संबंधिताना कळविण्यात येते की सदर प्रकरणी म्हणणे मांडण्यासाठी त्यांनी दिनांक १८/११/२०२६ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. अहिल्यानगर यांचे कार्यालयात दुपारी ठीक २.०० वाजता समक्ष हजर रहावे आपण सदर दिवशी हजर न राहिल्यास अथवा आपले लेखी । तौडी म्हणणे सादर न केल्यास आपले काही म्हणणे नाही असे गृहित धरुन पुढील कारवाई करणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
दिलीप तिलोरे
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था कर्जत, जि. अहिल्यानगर

दखल

गोरगरीबांची दिवाळी कार्यक्रम सोमवारा : संदीप

निघोज : संदीप पाटील वराळ गोरगरीबांची दिवाळी हा सामाजिक उपक्रम सोमवार दि.९ रोजी कपिलेश्वर मंगल कार्यालयात सकाळी १० वाजता माजी आमदार पोपटराव गावडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते तसेच कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व तालुक्यातील मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. यावर्षी दुष्काळी परिस्थिती असल्याने निघोज आणी परिसरातील मजुर व महिला भगीणी यांना रोजंदारी उपलब्ध होण्यासाठी अतिशय परिश्रम घ्यावे लागणार आहे. राज्य सरकारचे पाण्यावर कडक निर्बंध असल्याने कुकडी डावा कालवा व कुकडी नदीला पाणी रोटेशन कशाप्रकारे सुटणार याची अजिबात वेळापत्रक पाटबंधारे विभागाने जाहीर न केल्याने शेतकऱ्यांनी कोणते पिके घ्यावीत यासाठी शेतकरी संभ्रमात आहेत. याचा अर्थ कांदा लागवड कमी प्रमाणात होईल. म्हणून रोजंदारीचा प्रश्न निर्माण झाला आहे. गोरगरीब जनतेच्या घरी दिवाळी साजरी होईल का प्रश्न निर्माण झाला आहे. संदीप पाटील वराळ गोरगरीबांची दिवाळी हा सामाजिक उपक्रम गेली १२ वर्षांपासून सुरू आहे. माजी सरपंच व माजी उपसभापती संदीप पाटील वराळ यांनी हा उपक्रम गेली बारा वर्षांपूर्वी सुरू केला होता. त्यांच्या अनुपस्थितीत हा उपक्रम संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशन संस्थेने आजतागायत सुरू ठेवला आहे. यामध्ये यावर्षी किमान ही गोरगरीबांची दिवाळी दिड हजार कुटुंबांपर्यंत जाण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न होणार आहेत. यासाठी लोकसहभागातून हा कार्यक्रम दरवर्षी साजरा होत आहे. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

कुकडी डावा कालव्याला पाणी सोडल्याने शेतकऱ्यांत समाधान

निघोज : कुकडी सल्लागार समीतीच्या बैठकीत निर्णय घेऊन कुकडी डावा कालव्याला दि.५ नोव्हेंबर रोजी एक हजार क्युसेक्सने पाणी सोडले असून या ३५ दिवसाच्या रोटेशनचा फायदा शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होण्यासाठी होणार आहे. राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्व आमदारांना एकत्रित करुण पाणी सोडण्याचा निर्णय दि.१२ नोव्हेंबर ऐवजी दि.५ नोव्हेंबरला घेण्यात आला. याबाबत पारनेरचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी याबाबत दि.५ नोव्हेंबर रोजी पाणी सोडण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाठपुरावा केला. निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लामखडे, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, शिवनेरी वितरीकास्तरीय पाणी वापर संस्था महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष झिंजाड, अध्यक्ष शिवाजीराव डेरे, महासंघाचे कार्याध्यक्ष तथा कार्यकारी संचालक विश्वनाथ येवले, उपाध्यक्ष रामाशेठ निचीत, अमोल कातोरे, संचालक दिलीपराव मदगे, धोंडीभाऊ भोर, संतोषराव मोरे, पांडुरंग ढवळे, अरुणशेठ तांबोळी , धर्मनाथ पाणी वापर संस्थेचे चेअरमन नवनाथ सालके , शिवशक्ती पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष खंडूशेठ लामखडे आदींनी या पाणी सोडण्याच्या निर्णयाचे स्वागत केले असून पाटबंधारे विभागाने या पुढील पाणी रोटेशनचे वेळापत्रक जाहीर केल्यास शेतकऱ्यांना हिरवा चारा घेण्यासाठी वेळापत्रक तयार करता येईल अशी मागणी संबधीतांनी केली आहे.

भिंगारमध्ये विवाहितेला धक्काबुकी व विनयभंग; गुन्हा दाखल

निघोज : भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सदर बाजार मस्जिद गवळीवाडा परिसरात एका महिलेच्या अंगावर थुंकल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून मारहाण करत विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अहिल्यानगर पोलीस अधिक तपास करत आहेत. फिर्यादी महिला व साक्षीदार हे गतदिवशी रात्री मोटर सायकलवरून बाजार करण्यासाठी सदर बाजार भागात जात होते. त्यावेळी आरोपी सुशिलकुमार उर्फ तंबी सोले हा तिथे आला आणि फिर्यादी व साक्षीदार यांच्या अंगावर थुंकत होता. हा प्रकार पाहून साक्षीदार यांनी आरोपीस तुम्ही आमच्या अंगावर का थुंकत आहात, असे विचारले. या गोष्टीचा राग आल्याने आरोपीने साक्षीदार यांची कॉलर पकडून मारहाण केली व शिवीगाळ करत दमदाटी केली. तसेच धक्काबुकी करून वाद घातल्याने फिर्यादी या भांडणे सोडवण्यासाठी मध्ये गेल्या असता आरोपीने फिर्यादीच्या छातीला हात लावून दुपट्टा व बुस्खा ओढला. यादरम्यान आरोपीने फिर्यादी महिलेस लज्जा उत्पन्न होईल असे अयोग्य वर्तन केले. या घटनेची गंभीर दखल घेत पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

विखे पाटील हॉस्पिटलजवळ तरुणास लाथाबुक्क्यांनी मारहाण; दोघांवर गुन्हा

निघोज : अहिल्यानगर शहरातील विखे पाटील हॉस्पिटल, विळदघाट परिसरात चेष्टा मस्करीच्या कारणावरून झालेल्या वादातून दारू पिऊन आलेल्या दोघांनी एका खाजगी नोकरी करणाऱ्या तरुणास अडवून दारूसाठी पैशांची मागणी केली आणि पैसे देण्यास नकार दिल्याने शिवीगाळ करत खाली पाडून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे, ज्यामध्ये मारहाणीमुळे तरुणाच्या उजव्या खांद्या जवळील हाड क्रॅक झाल्याची गंभीर दुखापत झाली असून याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात कायदेशीर गुन्हा नोंदवण्यात आला आहे, मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार दिनांक एकतीस ऑक्टोबर रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास फिर्यादी अविनाश बाळासाहेब वाघमारे आणि आरोपी प्रविण जाधव व आकाश उर्फ गगन वैरागर हे विखे पाटील हॉस्पिटल, विळदघाट, अहिल्यानगर परिसरात एकमेकांमधे चेष्टा मस्करी करत उभे होते, त्यानंतर आरोपी तेथून निघून गेले परंतु त्याच दिवशी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास आरोपी पुन्हा दारू पिऊन त्या ठिकाणी परत आले आणि फिर्यादी अविनाश बाळासाहेब वाघमारे यांना तू लई माजला आहे तुला जास्त झाले आहे असे म्हणत जाब विचारू लागले, तेव्हा फिर्यादी यांनी आरोपींना तुम्ही दारू पिलेली आहे त्यामुळे तुम्ही मला बोलू नका आणि तुम्ही आपल्या घरी जा असे समजावण्याचा प्रयत्न केला, त्यावर संतापलेले आरोपी प्रविण जाधव आणि आकाश उर्फ गगन वैरागर यांनी फिर्यादीला तू आम्हाला दारू पिण्यासाठी पैसे देतो का अशी विचारणा केली, यावर फिर्यादी अविनाश बाळासाहेब वाघमारे यांनी माझ्याकडे तुम्हाला देण्यासाठी कोणतेही पैसे नाहीत असे स्पष्टपणे सांगितले, त्यामुळे प्रचंड राग आलेल्या आरोपींनी फिर्यादीला तुझ्याकडे आम्हाला देण्यासाठी पैसे नसतील तर आमचा मुत पी असे अपमानास्पद बोलून फिर्यादीला जमिनीवर खाली पाडले आणि लाथाबुक्क्यांनी व शिवीगाळ करत बेदम मारहाण केली, या हल्ल्या दरम्यान आरोपींनी फिर्यादी अविनाश बाळासाहेब वाघमारे यांच्या उजव्या खांद्यावर जोरदार लाथा मारल्यामुळे त्यांच्या उजव्या खांद्या जवळील हाड क्रॅक झाले असून जखमी तरुणाने दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर नऊशे सत्तर सन दोन हजार सवीस भारतीय न्याय संहिता कलम एकशे सत्रे उपकलम दोन, एकशे पंधरा उपकलम पाच, तीनशे बावन्न, तीनशे एक्कावन्न उपकलम दोन प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीक व फळपीक विमा योजनेत शेतकऱ्यांचा सहभाग वाढवा; व्यापक जनजागृती करा : वैभव तांबे

रब्बी हंगामातील पिकांसह फळपिकांचा विमा उतरविण्याचे आवाहन; कृषी विभाग, बँका व विमा कंपन्यांना निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, प्रतिकूल हवामान आणि उत्पादनातील घटीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी पीक विमा व फळपीक विमा योजनेत अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवावा. दुष्काळी परिस्थिती आणि पाण्याच्या उपलब्धतेतील अनिश्चितता लक्षात घेता रब्बी हंगामातील पिकांचाही विमा उतरविणे महत्त्वाचे आहे. योजनेची माहिती तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभाग, बँका आणि विमा कंपन्यांनी समन्वयाने व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले.

पीक विमा व फळपीक विमा योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या निर्देशानुसार आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक योगेश पाटील, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी विभागाचे क्षेत्रीय अधिकारी आणि विमा कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

खरीप पिकांच्या उत्पादकतेत घट

पीक कापणी प्रयोगांच्या आधारे पिकांची उत्पादकता निश्चित करून त्यानुसार विमा भरपाईची गणना केली जाते. यंदा खरीप हंगामातील अनेक पिकांच्या उत्पादकतेत घट दिसून येत आहे. मुगाचे अपेक्षित सरासरी उत्पादन सुमारे साडेसात क्विंटल असताना प्रत्यक्ष उत्पादकतेत घट नोंदविण्यात आली आहे. उडदाच्या उत्पादनातही घट झाली आहे. सोयाबीनच्या उत्पादनात सुमारे २० ते २२ टक्के, तर मक्याच्या उत्पादनात सुमारे १५ टक्के घट झाली आहे. भात पिकाचे पीक कापणी प्रयोग सुरू असून त्यातही मोठी घट अपेक्षित आहे. तूर आणि कांदा पिकांच्या उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

दुष्काळी परिस्थिती आणि पावसातील अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामातील या उत्पादन घटीची नोंद महत्त्वाची आहे. बाजरीचा अपवाद वगळता इतर पिकांच्या उत्पादकतेनुसार शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाई मिळण्याची शक्यता असल्याचे तांबे यांनी सांगितले.

रब्बी पिकांचा विमा उतरविण्याचे आवाहन

जिल्ह्यात रब्बी हंगामात गव्हाचे सुमारे ४० हजार हेक्टर, तर मका आणि हरभऱ्याचे प्रत्येकी सुमारे २५ हजार हेक्टर क्षेत्र आहे. कांदा आणि उन्हाळी मुगाचेही क्षेत्र मोठे आहे. या पिकांसाठी विमा हप्ता तुलनेने अत्यल्प आहे. ज्वारी, गहू, हरभरा आणि कांदा यांसारख्या पिकांसाठी साधारणपणे हेक्टरी ६० ते ७० रुपये विमा हप्ता येतो. त्यामुळे कमी खर्चात शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळू शकते.

काही भागांत शेतकरी ओलीवर पेरणी करतात, तर काही भागांत विहिरीच्या किंवा कालव्याच्या पाण्यावर पेरणी केली जाते. मात्र पेरणीनंतर पुढील काळात सिंचनासाठी पाणी उपलब्ध होईलच, याची खात्री नसते. अशा परिस्थितीत पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी सुरुवातीलाच विमा उतरवावा. चालू हंगामासाठी पीक विमा योजनेचे पोर्टल २ नोव्हेंबरपासून सुरू झाले आहे. बँकांनीही आपल्या स्तरावर योजनेची माहिती देऊन शेतकऱ्यांना सहभागी करून घ्यावे, असे त्यांनी सांगितले.

गतवर्षी खरीप हंगामात शेतकऱ्यांनी सुमारे ७१ लाख रुपये विमा हप्ता भरला होता. त्याबदल्यात शेतकऱ्यांना सुमारे १४ कोटी २० लाख रुपयांची भरपाई मिळाली. त्यामुळे पीक विम्याचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्याचे स्पष्ट होते.

फळपीक विमा क्षेत्रात अडीचपट वाढ

फळपीक विमा योजनेचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. गतवर्षी मृग बहारमध्ये १७६ शेतकऱ्यांनी १०४ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरविला होता. त्यापैकी ११७ शेतकऱ्यांना सुमारे ५४ लाख रुपयांची भरपाई मिळाली. चालू वर्षी आंबा पिकासाठी विमा संरक्षित क्षेत्र १०४ हेक्टरवरून २५४ हेक्टर झाले असून त्यात अडीचपट वाढ झाली आहे.

जिल्ह्यात केळीचे क्षेत्र सुमारे चार हजार हेक्टर असताना विमा संरक्षित क्षेत्र अद्याप कमी आहे. केळी उत्पादक शेतकऱ्यांना विमा उतरविण्यासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत मुदत आहे. आंबा पिकासाठी ३० नोव्हेंबर, तर डाळिंबासाठी १४ जानेवारीपर्यंत विमा उतरविता येणार आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेने संबंधित फळ उत्पादक शेतकऱ्यांशी संपर्क साधून त्यांचा विमा योजनेतील सहभाग वाढवावा, असे निर्देश त्यांनी दिले.

गारपिटीच्या नुकसानीसाठी अतिरिक्त संरक्षण आवश्यक

फळपीक विमा योजनेत तापमान, वाऱ्याचा वेग आणि आर्द्रता यांसारख्या हवामान घटकांच्या नोंदींच्या आधारे भरपाई निश्चित केली जाते. यासाठी महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची व्यवस्था आहे. मात्र गारपिटीमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी स्वतंत्र अतिरिक्त विमा संरक्षण (ॲड-ऑन कव्हर) घेणे आवश्यक आहे.

गारपीट झाल्यास शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कृषी सहाय्यक किंवा विमा कंपनीला तातडीने सूचना द्यावी. या नुकसानीसाठी वैयक्तिक पंचनामे केले जातात. कृषी विभागाचे कर्मचारी आणि विमा कंपनीचे प्रतिनिधी प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचे प्रमाण निश्चित करतात. त्यामुळे फळपीक विमा उतरविताना शेतकऱ्यांनी गारपिटीच्या अतिरिक्त संरक्षणाचाही लाभ घ्यावा.

विमा कंपन्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याचे निर्देश

चालू वर्षी प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी एचडीएफसी एर्गो, तर फळपीक विमा योजनेसाठी ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया (एआयसी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दोन्ही कंपन्यांचे जिल्हास्तरीय कार्यालय तसेच तालुकास्तरावर प्रतिनिधी उपलब्ध आहेत.

या प्रतिनिध्यांकडून शेतकऱ्यांना योग्य माहिती दिली जाते का, विमा नोंदणीसाठी सहकार्य केले जाते का आणि प्रचार-प्रसिद्धी प्रभावीपणे होते का, यावर तालुका कृषी अधिकाऱ्यांनी नियमित देखरेख ठेवावी. कृषी विभाग, बँका आणि विमा कंपन्यांनी समन्वयाने काम करून पीक व फळपीक विमा योजनेचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे निर्देश वैभव तांबे यांनी दिले.

दखल

सावकार अरगडे, राजश्री मोटे,अशोक हिंगे यांची ' आयडॉल टीचर ' म्हणून निवड







लोणी धामणी, आंबेगाव : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (SCERT) कडून आंबेगाव तालुक्यातील ३२ शिक्षकांची शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये सावकार बबन अरगडे (अवसरी बुद्रूक) जयश्री अरुण मोटे (लोणी), अशोक हिंगे (ढोबळेवाडी) या प्राथमिक शाळेतील शिक्षकांची 'आयडॉल टीचर' म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. या तिघानीही शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न, नवनवीन अध्यापन पद्धतीचा वापर आणि विद्यार्थ्यांशी असलेले आपुलकीचे नाते, विद्यार्थ्यांचे लाडके शिक्षक अशी त्याची ओळख आहे. SCERT कडून झालेल्या या निवडीमुळे आंबेगाव तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांकडून मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

माऊलींच्या चरणी अजित कडकडे यांची स्वरसेवा



आळंदी देवाची : श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात आयोजित दिवाळी संगीत महोत्सवात धनत्रयोदशी निमित्त शुक्रवारी (ता. ६) पहाटे ज्येष्ठ गायक अजित कडकडे यांच्या गायनसेवेने दिवाळी पहाट भक्तिमय वातावरणात रंगली. पहाटे सहा ते आठ या वेळेत झालेल्या या संगीत मैफलीत कडकडे यांनी आपल्या सुमधुर गायकीतून माऊलींच्या चरणी स्वरसेवा अर्पण केली. त्यांच्या अभंग आणि भक्तिगीतांच्या सादरीकरणाने मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. उपस्थित भाविक आणि संगीतप्रेमींनी त्यांच्या गायनाला उत्स्फूर्त दाद दिली. माऊलींच्या संजीवन समाधीच्या सान्निध्यात झालेली ही स्वरमैफल रसिकांसाठी अविस्मरणीय ठरली.यावेळी पुणे विभागाचे सहधर्मादाय आयुक्त संस्थानचे पदसिद्ध अध्यक्ष दिनेश कोठलीकर, प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजननाथ, ॲड.राजेंद्र उमाप, चैतन्य महाराज कबीरबुवा, पुरुषोत्तम महाराज पाटील, ॲड.रोहिणी पवार व व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर उपस्थित होते. श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या वतीने ५ ते ११ नोव्हेंबरदरम्यान या दिवाळी संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, सात दिवस नामवंत कलाकारांची गायनसेवा माऊलींच्या चरणी अर्पण केली जात आहे.

धानोरेत विषारी औषध पिऊन इसमाची आत्महत्या



तळेगाव ढमढेरे : धानोरे (ता. शिरूर) येथे एका इसमाने विषारी औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून आप्पासाहेब रामदास भोसुरे असे सदर इसमाचे नाव आहे.

धानोरे (ता. शिरूर) येथील आप्पासाहेब भोसुरे हे रात्रीच्या सुमारास घरामध्ये असताना अचानक त्यांच्या ओरडण्याचा आवाज आल्याने त्यांचा मुलगा भानुदास यांनी घरात जाऊन पाहिले असता आप्पासाहेब यांनी गवतावर मारण्याचे रोगर नावाचे विषारी औषध पिल्याचे दिसून आल्याने त्यांना उपचारासाठी शिक्रापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र आप्पासाहेब यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना उपचारासाठी वाघोली येथील रुग्णालयात हलविण्यात आले मात्र उपचारापूर्वीच आप्पासाहेब रामदास भोसुरे (वय ५३ वर्षे रा. धानोरे ता. शिरूर जि. पुणे) यांचा मृत्यू झाला घडलेल्या प्रकाराबाबत भानुदास आप्पासाहेब भोसुरे (वय २६ वर्षे रा. धानोरे ता. शिरूर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवलदार संदीप इथापे हे करत आहे.

घरफोडी करणाऱ्या टोळीचा वडगाव निंबाळकर पोलिसांकडून पर्दाफाश; चोरीची वॉशिंग मशीन जप्त

नावळी येथील २४ वर्षीय आरोपीला अटक, अन्य चार साथीदारांचा शोध सुरू

विनोद गोलांडे । राष्ट्र सह्याद्री

सोमेश्वरनगर : बारामती तालुक्यातील मुर्टी येथे झालेल्या घरफोडी चोरीच्या गुन्ह्याचा वडगाव निंबाळकर पोलिसांनी यशस्वी तपास करत पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पुरंदर तालुक्यातील नावळी येथील सिद्धार्थ सोमनाथ सोनवणे (वय २४) याला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून चोरीस गेलेली पॅनासॉनिक कंपनीची वॉशिंग मशीन जप्त करण्यात आली आहे. या गुन्ह्यात त्याचे अन्य चार साथीदार सहभागी असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, ते फरार आहेत.

मुर्टी (ता. बारामती) गावच्या हद्दीत घरफोडी करून चोरी झाल्याची तक्रार वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात प्राप्त झाली होती. त्यानुसार गुन्हा रजिस्टर क्रमांक २२८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (३), (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांनी तातडीने तपास पथक नियुक्त केले. पोलीस उपनिरीक्षक राहुल साबळे व गुन्हे शोध पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी पुरंदर तालुक्यातील नावळी गावच्या हद्दीत शोधमोहीम राबवली. यावेळी संशयित सिद्धार्थ सोमनाथ सोनवणे याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने आपल्या अन्य चार साथीदारांसह सदर घरफोडी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर त्याला गुन्ह्यात अटक करण्यात आली असून, चोरीस गेलेली पॅनासॉनिक कंपनीची वॉशिंग मशीन पंचनामा करून जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणातील फरार आरोपी सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, अटक केलेल्या आरोपीकडे अधिक चौकशी केली असता, आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार सादिक इनामदार करीत आहेत.



या पथकाने केली कारवाई

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, बारामती विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते, पोलीस उपनिरीक्षक राहुल साबळे, पोलीस हवालदार सादिक इनामदार, अनिल खेडकर, कल्याण खांडेकर, किरण शेलार, नितीन तांबे, दत्तात्रय शेगर, हृदयनाथ देवकर तसेच पोलीस शिपाई आबा जाधव, धनंजय भोसले, नरेंद्र यादव, सूरज धोत्रे, नागनाथ परगे व निलेश जाधव यांनी ही कारवाई केली.

काकड आरतीच्या स्वरांनी जारकरवाडीत भक्तीमय वातावरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

निरगुडसर : उठा जागे व्हा रे आता.. स्मरण करा पंढरीनाथा.. भावे चरणी ठेवा माथा.. चुकवा व्यथा जन्माच्या. अशा पहाटेच्या काकड आरतीच्या मधुर स्वरांनी आंबेगाव तालुक्यातील खेडीपाडी जागी होऊ लागली आहेत. आंबेगाव तालुक्यातील प्रत्येक खेड्यापाड्यात ग्रामदेवतांच्या मंदिरात कोजागिरी पौर्णिमेला काकड आरती महोत्सव सुरू आहे.गावातील भाविक पहाटे चार वाजता स्नान करून मंदिरात हजर होतात. गुलाबी थंडीच्या वातावरणात ही काकड आरती मंजुळ स्वरात सुरू होते, पांडुरंग रुक्मिणीच्या मूर्तीला अभिषेक केला जातो. सुगंधी अगरबत्ती लावतात देवाचे हे मनमोहक रूप पाहून डोळ्यात साठवून ठेवावे असेच असते. भजन मंडळी टिपेच्या स्वरात संत तुकोबाराय संत नामदेवराय संत एकनाथ महाराज यांचे अभंग टाळ विना मृदुंग हार्मोनियमच्या साथीने अळवतात भजनाबरोबरच जीवन जगण्यावर चिंतन करायला लावतात.थंडीतील भजन म्हणून काकड आरती असा शब्द प्रयोग झाला असावा असे ज्येष्ठ वारकरी सांगतात. शेवटी भैरवीने या काकड आरतीची सांगता होते. जारकरवाडी येथील पांडुरंग म मंदिरात व सर्वच गावात हा काकडा महोत्सव त्रिपुरारी पौर्णिमेला म्हणजे ८ सप्टेंबरला चिंतन करायला लावून संपेल जारकरवाडी येथे विठ्ठल मंदिरात कार्तिक स्नान सोहळा उत्साहात संपन्न होत आहे.




शिक्रापुरात गोमांसची गाडी सोडून चालक फरार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

तळेगाव ढमढेरे, : शिक्रापूर (ता. शिरूर) येथे गोमांसाची वाहतूक करणाऱ्या कारचा अपघात झाल्यानंतर सदर गाडी रस्त्याच्या मध्यभागी सोडून चावी घेऊन चालक फरार झाला असल्याची धक्कादायक घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अज्ञात चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिक्रापूर (ता. शिरूर) येथील चाकण चौक येथे अहिल्यानगर बाजूने पुणेच्या दिशेने भरधाव वेगाने गोमांस घेऊन येणारी एम एच ४५ एन ९२६० हि बोलेरो कार समोरील एका बसला धडकल्याने अपघात झाला, दरम्यान येथील नागरिक सदर वाहनाजवळ आले असता बोलेरो चालक वाहन रस्त्याच्या मध्यभागी सोडून चावी घेऊन पसार झाला, दरम्यान नागरिकांनी वाहनाची पाहणी केली असता वाहनांमध्ये गोमांस असल्याचे दिसून आले, याबाबतची माहिती मिळतात पोलीस हवालदार किरण ढुके, शरद काडकूड, लखन शिरसकर, मंगेश बोरुडे, बजरंग दलाचे अध्यक्ष भरत खोले यांसह आदी घटनास्थळी दाखल झाले, आजूबाजूला पाहणी केली असता वाहन चालकाबाबत काही माहिती मिळू शकली नसल्याने पोलिसांनी पप्पू मांजरे, मंगेश खैरे यांसह आदींच्या मदतीने क्रेनच्या मदतीने वाहन पोलीस स्टेशन येथे घेत जप्त केले, घडलेल्या प्रकाराबाबत पोलीस शिपाई शरद वाल्मिक कारकुड (वय ३९ वर्षे रा. शिक्रापूर ता. शिरूर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात वाहन चालकावर गोवंश हत्याबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहे.




कोंबड्यांच्या खुराड्यात बिबट्या शिरला

भयभीत मालकाने दरवाजा बंद केला, वनविभागाच्या तत्पर्यतेने बिबट्या जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

डिंभे: शिनोली(ता.आंबेगाव) येथील भोजनेवाडी येथे कैलास भाऊ करवंदे यांच्या कोंबड्यांच्या खुरड्यात बिबट्या घुसल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत बिबट्याला जेरबंद करून माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात हलविण्यात आले आहे. पकडण्यात आलेल्या बिबट्या हा साधारणतः दोन ते अडीच वर्षाची मादी जातीचा बिबट्या आहे.

आंबेगाव तालुक्यातील शिनोली येथील भोजनेवाडी येथे काल रात्री ४ योजनेच्या सुमारास येथील रहिवासी कैलास भाऊ करवंदे यांच्या घराशेजारी असणाऱ्या कोंबड्यांच्या खुराड्यात काही तरी घुसल्याने कोंबड्यांच्या आवाजाने घरातील म णसांना जाग आली. त्यानंतर खुरड्यात मुंगूस किंवा तत्सम प्राणी घुसल्याच्या संशयाने करवंदे यांचा मोठा



मुलगा पाहण्यासाठी आत गेला. तेव्हा तिथे बिबट्या असल्याचे लक्षात आले. रात्रीची वेळ व अचानक समोर बिबट्या दिसतातच घरातील सर्वांची तारांबळ उडाली. हा बिबट्या संरक्षणासाठी पडविला लावलेला पत्रा उचकटून आतमध्ये शिरली होता .त्यानंतर करवंदे कुटुंबीयांनी ताबडतोब वनविभागाशी संपर्क साधला. माहिती मिळताच वनपाल प्रवीण लांघी यांनी तातडीने तेथे भेट देऊन वरिष्ठांना कळविले. त्यानंतर लगेचच घोडेगाव वनपरिक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर व वन विभागाची टीम घटनास्थळी दाखल झाली. माणिकडोह येथून डॉट एक्सपर्ट यांना पाचरण करून बिबट्याला बेशुद्ध करण्यात आले. वनविभागाने बिबट्याला सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले असून, पुढील उपचार व देखभालीसाठी माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात हलविण्यात आले आहे.

दरम्यान घडलेल्या घटनेचा पंचनामा करून शेतकऱ्याला वनविभागात मार्फत झालेले नुकसानीची भरपाई मिळावी तसेच या परिसरात अजूनही बिबट्यांचा वावर असल्यामुळे येथे पिंजरा लावण्यात यावा अशी मागणी येथील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

माणिकडोह बिबट निवारा केंद्रचे डार्ट एक्स्पर्ट डॉक्टर विसलकर, वनपरिक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर, शिनोली वनपाल प्रवीण लांघी, कानसे वनपाल नारायण गिऱ्हे, शिनोली वनरक्षक सोनाली जाधव व इतर वनकर्मचारी यांनी उपवनसंरक्षक जुन्नर प्रशांत खाडे, सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण केले. मानद वन्यजीव रक्षक धनंजय कोकणे,वन्यजीव अभ्यासक नवनाथ फलके वनविभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

बिबट्याला सुरक्षितरित्या ताब्यात घेण्यात घेऊन माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्र पाठवण्यात आले आहे. नागरिकांनी काळजी म्हणून रात्रीच्या वेळी पाळीव प्राणी बंदिस्त जागेत ठेवावेत - कुणाल लिमकर - घोडेगाव वनपरिक्षेत्र अधिकारी.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी माऊली संस्थानचा पुढाकार

मुख्यमंत्री सहायता निधीस २५ लाख; मराठवाड्यातील गावांना ११ लाखांचे धान्यवाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आळंदी देवाची : महाराष्ट्रातील दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेऊन श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीस २५ लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. तसेच मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त गावांमधील नागरिकांसाठी ११ लाख रुपयांचे धान्यवाटप करण्यात येणार असल्याची घोषणा संस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे यांनी केली. यावेळी संस्थान कमिटीचे पदसिद्ध अध्यक्ष व पुणे विभागाचे सहधर्मादाय आयुक्त दिनेश एकनाथ कोठलीकर, विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा, ॲड.राजेंद्र उमाप, योगी निरंजननाथ, ॲड.रोहिणी पवार, पुरुषोत्तम महाराज पाटील उपस्थित होते.

दुष्काळामुळे संकटात सापडलेल्या नागरिकांना दिलासा मिळावा आणि त्यांच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात मिळावा, या उद्देशाने संस्थानने हा निर्णय घेतला आहे.संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मानवता, समता आणि परोपकाराच्या शिकवणुकीतून प्रेरणा घेत संस्थानने सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने हा पुढाकार घेतला आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीस देण्यात येणाऱ्या २५ लाखांच्या मदतीसह मराठवाड्यातील गरजू गावांमध्ये ११ लाख रुपयांचे धान्य वितरित करण्यात येणार असल्याने संस्थानच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे.

दिवाळीच्या खरेदीवर दुष्काळाचे सावट

बाजारपेठेतील उलाढाल मंदावली!शेतकऱ्यांच्या खिशात पैसा नसल्याने ग्राहकांची खरेदीकडे पाठ; व्यापाऱ्यांनी केलेला मालाचा साठा पडून, व्यावसायिक चिंतेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी, कोळगाव, बेलवंडी स्टेशनसह विविध बाजारपेठांमध्ये खरेदीचा अपेक्षित उत्साह दिसून येत नाही. यंदा दुष्काळी परिस्थितीने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून, त्याचा थेट फटका दिवाळीच्या बाजारपेठेला बसत आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने ग्राहकांनी खरेदीला आखडता हात घेतला आहे. परिणामी, दिवाळीसाठी मोठ्या प्रमाणात मालाची खरेदी करून ठेवलेले व्यापारी ग्राहकांच्या प्रतीक्षेत आहेत.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांनी कपडे, भांडी, किराणा, इलेक्ट्रॉनिक्स, आकाशकंदील आणि फटाक्यांचा मोठ्या प्रमाणात साठा केला आहे. मात्र, ग्राहक दुकानात येऊन वस्तूंचे भाव विचारत आहेत; पण प्रत्यक्ष खरेदी करताना हात आखडता घेत आहेत. दरवर्षी दिवाळीच्या काळात बाजारपेठांमध्ये होणारी गर्दी यंदा कमी झाल्याने व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे.

शेतकऱ्यांच्या खिशात पैसा कधी येणार?
- खरीप हंगामातील पिकांचे नुकसान.
- विहिरी आणि तलावांतील पाणीसाठ्यात घट.
- आगामी रब्बी हंगामाबाबत अनिश्चितता.
- दुष्काळी मदत आणि पीकविमा भरपाईची प्रतीक्षा.
- ग्राहकांची खरेदी घटल्याने व्यापारी चिंतेत.
- उधारीच्या व्यवहारांत वाढ; बाजारपेठेवर आर्थिक ताण.

श्रीगोंदा येथील बगाडे कॉर्नर परिसरातील साई कलेक्शनचे व्यावसायिक आकाश दांगडे यांनी सांगितले की, दिवाळीच्या खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात कपड्यांचा साठा केला आहे. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे ग्राहकांची संख्या कमी झाली आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने कपड्यांच्या खरेदीवरही मर्यादा आल्या आहेत. गतवर्षीच्या तुलनेत यंदा व्यवसायात अपेक्षित वाढ झालेली नाही.

अनियमित पाऊस, खरीप पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई आणि आगामी रब्बी हंगामाची अनिश्चितता यामुळे शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. त्याचा परिणाम केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित न राहता शेतमजूर, लहान व्यावसायिक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही झाला आहे. अनेक कुटुंबांनी मुलांचे नवीन कपडे, दिवाळीचा फराळ आणि घरगुती वस्तूंच्या खरेदीवर मर्यादा आणल्या आहेत.



दुष्काळी मदत आणि पीकविमा भरपाई मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना अद्याप आर्थिक दिलासा मिळालेला नाही. दुसरीकडे, उधारीवरील खरेदी वाढल्याने व्यापाऱ्यांचे आर्थिक व्यवहारही अडचणीत आले आहेत. दिवाळीच्या अखेरच्या दिवसांत तरी ग्राहक खरेदीसाठी बाहेर पडतील, अशी आशा व्यापाऱ्यांना आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या हातात पैसा आल्याशिवाय ग्रामीण बाजारपेठेतील मंदी दूर होणे कठीण असल्याचे चित्र आहे.


द•ख•ल

खा. निलेशजी लंके साहेब यांची निघोजमध्ये जल्लोषात मिरवणूक

निघोज : अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत खासदार निलेशजी लंके साहेब विक्रमी मत्ताधिक्याने निवडून आल्याबद्दल मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी मळगंगा यात्रा उत्सव कमिटीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत खासदर निलेशजी लंके यांना खांद्यावरून उचलून घेत मोठा जल्लोष करत मळगंगा देवीचे दर्शन घेतले. शिवाजीराव लंके हे खासदार निलेशजी लंके साहेब यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात.वरिष्ठ पातळीवर कोणतीही निवडणूक असो शिवाजीराव लंके हे खासदार निलेशजी लंके साहेब यांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात.निघोजमध्ये खासदार निलेशजी लंके साहेब यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. निघोज पंचायत समिती गणामध्ये शिवाजीराव लंके यांचा दुध व्यवसायाच्या माध्यमातून असलेला मोठा मित्र परिवार व याच गणांध्ये जवळचे नातेवाईक मोठ्या प्रमाणात आहेत हीच शिवाजीराव लंके यांची पंचायत समिती उमेदवारीसाठी जमेची बाजू असून लंके हे पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक असून त्यांचा विचार खासदार लंके हे करतील अशी खात्री शिवाजीराव लंके यांचे समर्थक कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत.



ढोकेश्वर विद्यालयात फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ



टाकळी ढोकेश्वर : महाराष्ट्र राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेऊन फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी विद्यार्थ्यांना फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ दिली. दिवाळी हा आनंदाचा आणि प्रकाशाचा सण आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी बोध घेऊन स्वतः फटाके न फोडण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांना व परिसरातील नागरिकांनाही पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी प्रोत्साहित करावे असे आवाहन पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी विद्यार्थ्यांना केले. या प्रसंगी शास्त्र समन्वयक प्रा.अशोक गांगड, प्रा. राजेंद्र ढोणे,आतिष झावरे,योगेश मांडगे,देविदास आठरे,पोपट जगदाळे,नितीन ढोकळे,भाऊसाहेब हिंगडे,सचिन महानवर,बाबासाहेब जाधव,सुनील झावरे,रविंद्र मते,निलम खिलारी,सुमन वाळुंज, नारायण शेळके,निलेश पाचर्णे,संदीप महांडुळे,अतुल सैद,सोनल रोहकले,वैशाली गायखे,श्रीरंग धामणे, सुरेखा ठाणगे,प्रिया डव्हणे,कल्पना जाधव,मंगेश पोपळघट,अनिकेत बांगर,रामदास नरवडे,सिमा खोसे, सुवर्णा दिघे,संजना विश्वासराव,कृपा खरे,विष्णू भद्रे, श्वेता शिर्के,दिनेश वायदंडे,स्वप्नील कदम,वसंत वाघेरे, रईसाबी शेख तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

न्यू इंग्लिश स्कुल शाळेचा ग्रामसेवकाने पाणीपुरवठा केला बंद

नगर तालुका : डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे समोर आले आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवका कडून शाळेचा पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून,हा पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करावा,अशी मागणी शाळेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी आमदार अक्षय कर्डिले यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सुमारे २८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये बहुतांश विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर व विटभट्टी कामगार कुटुंबातील आहेत.पिण्याचे पाणी बंद करण्याचा असा कुठलाही नियम नाही. शाळेला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात होता.मात्र, ग्रामपंचायतीने हा पाणीपुरवठा बंद केल्यामुळे विद्यार्थ्यांसमोर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.शाळेतील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता पिण्याच्या पाण्याची सुविधा बंद करणे योग्य नसल्याचे शिक्षकांनी निवेदनात नमूद केले आहे. विद्यार्थ्यांना शुद्ध व पुरेसे पाणी मिळणे आवश्यक असून, ग्रामपंचायतीने शाळेचा पाणीपुरवठा तातडीने पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.आमदार अक्षय कर्डिले यांनी या प्रश्नात लक्ष घालून विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाला सूचना द्याव्यात.

जखमी वासरासाठी राशीनच्या प्राणीप्रेमी युवकांची माणुसकीची धाव!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

राशीन : राशीन परिसरातील भिगवण रोडलगत रात्रीच्या सुमारास अज्ञात वाहनाच्या धडकेत एका छोट्या वासराच्या पायाचे हाड मोडल्याची घटना घडली. रस्त्याच्या कडेला वेदनेने विव्हळत असलेल्या या वासराला पाहताच राशीनमधील प्राणीप्रेमी युवकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली.

गजानन साळुंखे यांनी मेडिकलमधून तातडीने बँडेज पट्टी आणून वासराच्या जखमी पायाला पट्टी बांधली. यावेळी अक्षय धनवडे, लाहोर महाराज, रस्त्यालगत दुकान असलेले जहागीरदार तसेच इतर सहकारी नागरिकांनी वासराला बिसलेरीचे पाणी पाजून त्याची काळजी घेतली.



माणसांच्या वेदना समजून घेणारे हात मुक्या प्राण्यांच्या मदतीसाठीही पुढे सरसावले, याचे हे सुंदर उदाहरण ठरले. बोलता येत नसलेल्या मुक्या जीवाच्या वेदना ओळखून मदतीचा हात देणाऱ्या या युवकांच्या कृतीचे परिसरातून कौतुक होत आहे. माणुसकी फक्त माणसांसाठीच नाही, तर प्रत्येक मुक्या जीवासाठी असते, हेच राशीनच्या युवकांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले!

खा. लंके यांच्या वतीने दिपक लंके यांच्या हस्ते नूतन चेअरमन अंकुश लोखंडे यांचा सत्कार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : खासदार व जिल्हा सहकारी बँकेचे संचालक निलेश लंके यांच्या वतीने त्यांचे बंधू दिपक आण्णा लंके यांच्या हस्ते निघोज सोसायटीचे नूतन चेअरमन अंकुश लोखंडे यांचा बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात शुक्रवार दि.६ रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद सर, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, पतसंस्थेचे संचालक भिवाशेठ रसाळ, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त बाळासाहेब लंके, लोकनेते निलेश लंके प्रतिष्ठानचे प्रवक्ते विकास शेटे, निघोज सोसायटीचे संचालक असिमभाई हावलदार, सचिन लंके, दिलीप कवाद, शांताराम लाळगे आदी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिपक आण्णा लंके यावेळी म्हणाले खासदार निलेश लंके यांचा जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजय झाल्याने उत्तरेतील शक्तींचा पारनेर तालुक्यातील हस्तक्षेप थांबणार आहे.

आम्हीच पारनेर तालुक्यातील राजकारणाचे रिमोट कंट्रोल आहे हा त्यांचा गैरसमज तालुक्यातील जनतेने खोटा ठरवला आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांना बाजूला करुण आजपर्यंत जिल्हा सहकारी बँकेत उत्तरेतील पुढारी फक्त साखर कारखान्याला सर्वाधिक कर्जपुरवठा करुन स्वार्थ साधीत होते मात्र खासदार लंके यांच्या आक्रमक भूमिकेमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना सर्वाधिक कर्ज मिळणार असल्याची माहिती लंके यांनी दिली आहे.



निघोज परिसरातील जनतेने आजपर्यंत सर्व निवडणूकीत खासदार लंके यांना खंबीरपणे साथ केल्याबद्दल दिपक आण्णा लंके यांनी धन्यवाद व्यक्त करीत आगामी सर्व निवडणूकीत खासदार लंके यांचा करिष्मा पाहावयास मिळणार असल्याची ग्वाही दिली.

ऊसाचा ट्रक पलटी; शेतकऱ्यांच्या ऊसाचे मोठे नुकसान!



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

राशीन : राशीन येथील भिगवण रोडलगत सिद्धटेक रोडच्या दिशेने जाणाऱ्या बाहेरील कच्च्या रस्त्यावर टर्न घेत असताना ऊसाने भरलेला ट्रक पलटी झाल्याची घटना घडली. रस्त्यावर असलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे व रस्त्याच्या झोलामुळे ट्रकचा तोल जाऊन हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. या अपघातात ट्रकमधील मोठ्या प्रमाणावरील ऊस रस्त्यावर विखुरला गेल्याने शेतकऱ्यांच्या ऊसाचे मोठे नुकसान झाले. तसेच ट्रक पलटी झाल्यामुळे ट्रकच्या काचाही फुटल्या असून वाहनाचेही नुकसान झाले आहे. सुदैवाने या अपघातात ट्रकचालक बचावला असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही. दरम्यान, भिगवण रोडलगत सिद्धटेक रोडकडे जाणाऱ्या या कच्च्या रस्त्याची अवस्था लक्षात घेता रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता सुरक्षित व सुस्थितीत करावा.

दुष्काळी परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी : आ. कर्डिले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शिराळ चिंचोडी : जिल्ह्यात व राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी अस्वस्थ असला तरी राज्यातील महायुतीचे सरकार निश्चितपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून या दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांचे पशुधन वाचवण्यासाठी चारा पाण्याची व्यवस्था सरकारच्या माध्यमातून केली जाणार आहे. त्याचबरोबर या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शेतकरी केंद्रबिंदू ठेवून सर्वतोपरी उपाययोजना राज्य सरकारच्या माध्यमातून हाती घेतल्या जाणार आहेत त्यामुळे या टंचाईच्या परिस्थितीत प्रशासन आणि शेतकरी यांचा समन्वय महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन आमदार अक्षय कर्डिले यांनी केले आहे. पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील श्रीराम देवस्थान श्रीराम गड येथे रस्ता काँकटीकरण कामाचे भूमिपूजन व वस्तीवरील स्ट्रीट लाईट व रोहित्राचे उद्घाटन आमदार कर्डिले यांचे हस्ते पार पडले. यावेळी आमदार अक्षय कर्डिले म्हणाले या पुढील काळातही श्रीराम देवस्थानच्या विकास कामासाठी भरीव निधी दिला जाणार असून करंजीसह मतदारसंघातील प्रत्येक गावात विकास कामासाठी लोकनेते स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी दिलेला शब्द पूर्ण केला जाईल. सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पाण्याची बचत करणे देखील महत्त्वाचे आहे.शेतकऱ्यांनी एकमेकांना सहकार्याची भावना ठेवावी अशा टंचाईच्या परिस्थितीमध्ये प्रत्येकाला मदतीची आणि सहकार्याची गरज आहे.



प्रत्येक वाडी वस्तीवर टँकरने पाणीपुरवठा करण्याच्या सूचना प्रशासनाला केल्या असून वांबोरी चारीचे पाणी देखील लाभधारक तलावापर्यंत पोहचवण्यासाठी मुळा पाटबंधारे विभागाला सक्त सूचना केल्या असल्याचे आमदार अक्षय कर्डिले म्हणाले.

यावेळी माजी सभापती बाळासाहेब अकोलकर, संभाजी पालवे,मिर्झा मनियार, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सहचिटणीस कुशल भापसे,भाजपा मंडळ अध्यक्ष संतोष शिंदे,चेअरमन पुरुषोत्तम आठरे, मिरी तिसगाव नळ योजनेचे अध्यक्ष एकनाथ आटकर, माजी पंचायत समिती सदस्य सुनील परदेशी, माजी सरपंच सुनील साखरे, सुरेश चव्हाण, संभाजीराव वाघ,मार्केट कमिटीचे संचालक अरुण रायकर, चेअरमन भारत गारुडकर, चेअरमन संतोष अकोलकर, सरपंच गौतम कराळे,बंडू पाठक,अजय पाठक, प्रदीप टेमकर, प्रणील सावंत , संदीप वाघ, रवींद्र भापसे, रावसाहेब लोहकरे,नवनाथ भडके, रंगनाथ आंधळे,आबासाहेब अकोलकर, शिवाजी भाकरे,विश्वास क्षेत्रे, बाबासाहेब मोरे, भाऊ अकोलकर, शेखर मोरे, सुभाष अकोलकर, रूपचंद अकोलकर, भानुदास अकोलकर, उत्तम अकोलकर, डॉक्टर राजेंद्र अकोलकर, नवनाथ आरोळे,राहुल अकोलकर, एस एन अकोलकर,दादासाहेब अकोलकर यांच्यासह अनेक ग्रामस्थ व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. यावेळी श्रीराम देवस्थान कमिटी उत्तरेचर देवस्थान कमिटी तसेच करंजी ग्रामस्थांसह पाथर्डी तालुका पत्रकार संघटनेचे वतीने आ. अक्षय कर्डिले यांचा प्रभू श्रीरामांची प्रतिकृती भेट देऊन सन्मान करण्यात आला.

धारवाडी गावाचा 'वांबोरी चारी टप्पा १ किंवा २' मध्ये समावेश करा

ग्रामस्थांकडून आ. अक्षय कर्डिले यांना निवेदन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

चिचोंडी शिराळ : पाथर्डी तालुक्यातील सतत दुष्काळाचा सामना करणाऱ्या धारवाडी गावाचा 'वांबोरी चारी टप्पा १ किंवा २' मध्ये तातडीने समावेश करण्यात यावा, अशी आग्रही मागणी धारवाडी ग्रामस्थांनी आमदार अक्षय कर्डिले यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. मुख्य पाईपलाईन गावातून जाऊनही गाव पाण्यापासून वंचित असल्याने ग्रामस्थांमध्ये मोठी तीव्र भावना आहे.

मुख्य लाईन शिवारातूनच; नवीन पाईपलाईनची गरज नाही धारवाडी गाव हे वांबोरी चारी टप्पा १ मधून वगळण्यात आले आहे. वास्तविक पाहता, या योजनेची मुख्य पाईपलाईन धारवाडी शिवारातील गवळी वस्ती, गिते वस्ती, सोनवणे वस्ती, आंधळे वस्ती, आव्हाड वस्ती आणि गोरे वस्ती या भागांमधूनच गेलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी कोणत्याही नवीन पाईपलाईनची आवश्यकता नाही. केवळ मुख्य लाईनजवळ असलेल्या स्थानिक नदी, बंधारे व लहान-मोठ्या तलावांच्या ठिकाणी 'बारे आणि वॉल' बसवून दिले, तरी संपूर्ण गावाचा पाण्याचा गंभीर प्रश्न सुटू शकतो, असे ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिले.

स्वर्गीय कर्डिले साहेबांच्या शब्दाची आठवण गावाला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे. यापूर्वी माजी मंत्री स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्याकडेही ग्रामस्थांनी ही मागणी केली होती. त्या वेळी त्यांनी धारवाडी गाव पाण्यापासून वंचित राहणार नाही, गावाला वांबोरी चारीचे पाणी मिळवून देईन, असे वचन दिले होते. स्वर्गीय कर्डिले यांनी दिलेले वचन आमदार अक्षय कर्डिले नक्कीच पाळतील, असा ठाम विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.



विखे-पाटील आणि कर्डिले नेतृत्वावर विश्वास या प्रश्नी लवकरच जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनाही लेखी निवेदन देण्यात येणार आहे. नामदार विखे पाटील, आमदार अक्षय कर्डिले आणि माजी खा. सुजय विखे पाटील हे नेतृत्व एकत्र येऊन स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या वचनपूर्तीसाठी हा प्रश्न सकारात्मकतेने मार्गी लावतील, अशी आशा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

आ. अक्षय कर्डिले यांचे आश्वासन निवेदन स्वीकारताना आमदार अक्षय कर्डिले यांनी ग्रामस्थांना आश्वस्त केले की, धारवाडीचा वांबोरी चारीचा प्रश्न आपण लवकरच मार्गी लावू. ग्रामस्थांचे निवेदन आणि ग्रामपंचायतीचा ठराव जलसंधारण अधिकाऱ्यांकडे तात्काळ सादर करून गावाला पाणी मिळवून देण्यासाठी पूर्ण पाठपुरावा करू.

वांबोरी चारीतून पाणी मिळाल्यास गवळी वस्ती, सोनवणे वस्ती, आंधळे वस्ती, आव्हाड वस्ती, गोरे वस्ती, तसेच 'शिवाचा ओढा' आणि गावातील सर्व प्रमुख बंधारे पूर्ण क्षमतेने भरतील. यामुळे धारवाडी गाव सुमारे ७० टक्के पाणीदार होण्यास मदत होणार आहे.

या वेळी गावातील सर्व प्रमुख वस्त्यांमधील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

शनिवार, दि.०७ नोव्हेंबर २०२६ । पान ८

प्रवरेतील अनधिकृत बंधारे हटवा; अन्यथा तीव्र आंदोलन

तीन आठवड्यांची मुदत; भंडारदरा लाभक्षेत्र पाणी समितीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : निळवंडे धरण ते ओझर बंधारा दरम्यान प्रवरा नदीपात्रात उभारण्यात आलेले किमान १९ अनधिकृत प्रोफाइल वॉल्स तातडीने हटवावेत, नदीपात्रातील विहिरी बुजवून उपसा सिंचन योजना बंद कराव्यात, अशी मागणी भंडारदरा लाभक्षेत्र पाणी समितीने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.



येत्या तीन आठवड्यांत मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास दिवाळीच्या काळात तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही समितीने दिला आहे. ५ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेनंतर समितीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. प्रवरा नदी ही अधिसूचित कालवा असल्याने त्यातील पाणी अडविणारे बंधारे अनधिकृत आहेत.

या बंधाऱ्यांमुळे भंडारदरा धरणाच्या सिंचन व पिण्याच्या पाण्याच्या आवर्तनात मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत असल्याचा दावा समितीने केला आहे. २०१९ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी हे बंधारे हटविण्याचे आदेश दिल्याचाही उल्लेख निवेदनात आहे.

१ डिसेंबरच्या सिंचन आवर्तनापूर्वी अडथळे हटविल्यास दोन आवर्तनांत सुमारे दोन टीएमसी पाणी वाचून पिण्याच्या पाण्याची सहा आवर्तने देता येतील, असा समितीचा दावा आहे. तसेच गावांची तळी दोनदा भरून देणे, सिंचन थकबाकी माफ करणे आणि पाणी मागणी व शुल्क भरण्यासाठी ऑनलाइन सुविधा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

समितीचे अध्यक्ष सुरेश ताकेपाटील यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, शेतकरी व नागरिकांनी निवेदनावर सह्या केल्या आहेत.

मराठवाडा वॉटर ग्रीडला गती ; जायकाकडून २० हजार कोटींचे अर्थसहाय्य

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : मराठवाड्यातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवून संपूर्ण विभाग दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाला आता गती मिळणार आहे. या प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (जायका) कडून सुमारे २० हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य उपलब्ध होणार असून, प्रकल्पाचा प्राथमिक अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. २०२९ पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील वर्षा निवासस्थानी जायकाच्या वरिष्ठ शिष्टमंडळासमवेत उच्चस्तरीय बैठक झाली. यावेळी मराठवाडा वॉटर ग्रीडसह महाराष्ट्र आणि जपानच्या सहकार्याने सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. वॉटर ग्रीडचा प्राथमिक प्रकल्प अहवाल तातडीने तयार करून केंद्र सरकारच्या आर्थिक व्यवहार विभागाकडे पाठविण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. चार जिल्ह्यांतील धरणे पाइपलाइनने जोडणार मराठवाड्यातील पाण्याचे असमान वितरण लक्षात घेऊन अतिरिक्त पाणीसाठा असलेल्या धरणांमधून दुष्काळी भागातील धरणांपर्यंत बंदिस्त पाइपलाइनद्वारे पाणी पोहोचविणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर आणि धाराशिव या चार जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. जायकवाडी, माजलगाव, मांजरा, उजनी, निम्न तेरणा आणि निम्न मनार ही धरणे परस्परांना जोडण्यात येणार आहेत. या प्रकल्पांतर्गत सुमारे तीन हजार ९५ किलोमीटर लांबीच्या मुख्य व दुय्यम पाइपलाइन आणि १५ जलशुद्धीकरण केंद्रांची उभारणी केली जाणार आहे. याचा सुमारे एक कोटी नागरिकांना थेट लाभ होणार आहे. संपूर्ण आठ जिल्ह्यांतील प्रकल्पाची अंदाजित किंमत २५ हजार ५६ कोटी रुपये असून, पहिल्या टप्प्यासाठी २० हजार कोटींचे कर्जसहाय्य देण्याबाबत जायकाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. लातूर आणि धाराशिव हे भूकंपप्रवण क्षेत्र असल्याने प्रकल्पाच्या बांधकामात जपानचे आधुनिक भूकंपरोधक तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. यामध्ये आधुनिक पाइपलाइन, पंपिंग यंत्रणा आणि स्वयंचलित नियंत्रण प्रणालीचा समावेश असेल. तसेच छत्रपती संभाजीनगरमधील ऑरिक सिटी, शेंद्रा-बिडकीन आणि वाळूज औद्योगिक क्षेत्राला शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी तसेच जपानच्या महावाणिज्यदूत हितोमी सातो आणि जायकाचे भारतातील प्रतिनिधी उपस्थित होते.

अखेर नरभक्षक बिबट्या जेरबंद

वनविभागाच्या प्रयत्नांना यश; ग्रामस्थांना दिलासा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील गोधेगाव परिसरात अनेक दिवसांपासून दहशत माजवणाऱ्या बिबट्याला जेरबंद करण्यात अखेर वनविभागाला यश आले असून बिबट्या जेरबंद केला असला तरी ही बिबट्याची ही दहशत व भीती वाड्या वस्त्यांवर राहणाऱ्या नागरिकांमध्ये व परिसरात कायम असल्याचे चित्र आहे.

गोधेगाव येथे बिबट्याकडून शेतमजुराचा बळी घेणे, शाळकरी मुलगा व महिलेवर हल्ला करणे, तसेच पाळीव कुत्र्याला फस्त करण्याच्या सलग घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण होते. आमदार विठ्ठलराव लंघे यांनी याबाबत गांभीर्याने घेऊन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्याजवळ गुरूवारी रात्री हा बिबट्या आला होता. पिंजऱ्यात शेळीही ठेवली होती. परंतु बिबट्या काही केल्याने पिंजऱ्यात जाईना. मग वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी पिंजऱ्याजवळच त्याला बेशुद्ध करीत जेरबंद करण्यात यश मिळविले. सुरेश अहिरे तसेच महिलेवर हल्ला करणारा हाच बिबट्या आहे का? की दुसरा हे समजू शकले नाही. बिबट्या जेरबंद झाल्याने गोधेगाव, भालगाव परिसरातील ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

गुरूवारी पहाटे बिबट्याने कुत्र्यांला ठार करून एका महिलेवर हल्ला केल्याची घटना झाल्याने शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे.



दरम्यान, २० दिवसानंतरही बिबट्या वनविभागाच्या हाती लागत नसल्याने शेतातील कामे कशी करायची? आम्ही जगायचे कसे? अशी आर्त हाक गोधेगावच्या शेतकऱ्यांनी दिली आहे. तालुक्यातील गोधेगाव परिसरात बिबट्याची दहशत कायम आहे. गुरुवारी पहाटे बिबट्याने आधी एका कुत्र्याला ठार केले, त्यानंतर घरात झोपलेल्या महिलेवर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात कुसुम हिरामण पल्हारे (वय ६१) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ही बिबट्याची दहशत असतांना महिलेवर हल्ल्याच्या घटनेने पुन्हा खळबळ उडाली आहे. अहिरे हल्ला व महिलेवर झडप हे अर्धा किलोमीटरचे अंतर असल्याने हा नरभक्षक बिबट्याचा वावर याच परिसरात असल्याचे नागरिक ठामपणे सांगत आहेत.

शरद पवार यांच्या प्रकृतीची थोरात यांनी रुग्णालयात जाऊन केली विचारपूस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : ज्येष्ठ नेते तथा खासदार शरदचंद्र पवार हे मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आज रुग्णालयात जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांनी पवार यांच्या तब्येतीची आस्थेवाईकपणे चौकशी करून त्यांना लवकरात लवकर उत्तम आरोग्य लाभावे, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.



शरद पवार मागील दोन दिवसांपासून रुग्णालयात उपचार घेत असून त्यांच्या प्रकृतीची माहिती समजल्यानंतर राज्यातील विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील मान्यवरांनी भेट घेऊन विचारपूस केली आहे. त्यांच्या प्रकृतीबाबत राज्यभरातून काळजी व्यक्त होत आहे.

बाळासाहेब थोरात यांनी काल नाशिक येथे उत्तर महाराष्ट्रातील काँग्रेसच्या संघटनात्मक बैठकीत सहभाग घेतला. बैठक संपल्यानंतर मुंबईत दाखल होत त्यांनी आज दुपारी ब्रीच कँडी रुग्णालयात पवार यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्याशी संवाद साधत प्रकृतीची माहिती घेतली.

शरद पवार यांचे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनातील योगदान मोठे आहे. विशेषतः शेती, सहकार, ग्रामीण विकास आणि शेतकरी हिताच्या प्रश्नांवर त्यांनी दीर्घकाळ काम केले आहे. त्यांचे अनुभव आणि मार्गदर्शन राज्याला यापुढेही लाभत राहावे, यासाठी त्यांनी लवकरात लवकर पूर्ण बरे होऊन पुन्हा जनसेवेत सक्रिय व्हावे, अशी अपेक्षा थोरात यांनी व्यक्त केली. या भेटीप्रसंगी मुंबई काँग्रेसचे पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

अनोळखी लिंक उघडली अन् शेतकऱ्याच्या खात्यातील ५० हजार गायब!

मोबाईलचा ताबा घेत सायबर चोरट्यांचा डल्ला; दिवाळीतच कोळपे कुटुंबावर आर्थिक संकट



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : आयुष्यभर शेतीत कष्ट करून पै-पै साठवलेल्या पैशांवर सायबर चोरट्यांनी एका क्लिकमध्ये डल्ला मारला. मोबाईलवर आलेली अनोळखी लिंक उघडताच मोबाईलचा ताबा घेत सायबर गुन्हेगारांनी शेतकऱ्याच्या बँक खात्यातून तब्बल ५० हजार रुपये परस्पर काढून घेतले. कोळपेवाडी येथील जनार्दन सुखदेव कोळपे यांच्यासोबत ही घटना घडली. ऐन दिवाळीतच कष्टाची कमाई गमावण्याची वेळ आल्याने कोळपे कुटुंबाला मोठा आर्थिक धक्का बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जनार्दन कोळपे यांच्या मोबाईलवर एक अनोळखी वेब लिंक आली होती. उत्सुकतेपोटी त्यांनी ती उघडली आणि काही क्षणांतच सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाईलचा ताबा मिळविला. पुढील सुमारे २४ तास मोबाईल हॅक असल्याने त्यांना त्यावरील व्यवहारांची माहितीही मिळाली नाही. मोबाईल पूर्ववत सुरू झाल्यानंतर युनियन बँक ऑफ इंडियाच्या खात्यातून ५० हजार रुपये कपात झाल्याचा संदेश आला. खात्यातील रक्कम परस्पर काढून घेतल्याचे समजताच त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यानंतर त्यांनी तातडीने युनियन बँकेच्या कोळपेवाडी शाखेशी संपर्क साधून लेखी तक्रार दिली. बँकेने हा तक्रार अर्ज पडताळणी व पुढील तपासासाठी सायबर विभागाकडे पाठविला आहे.

शेतीत राबून आणि कष्टाने जमा केलेली रक्कम एका अनोळखी लिंकवर क्लिक केल्यामुळे गमावण्याची वेळ आली. दिवाळीच्या सणात कुटुंबासाठी केलेल्या आनंदाच्या नियोजनावर या घटनेने पाणी फेरले. ग्रामीण भागातही सायबर गुन्हेगारांचे जाळे विस्तारत असल्याचे या घटनेतून पुन्हा स्पष्ट झाले आहे. त्यामुळे मोबाईलवर येणाऱ्या अनोळखी संदेशांबाबत आणि लिंकबाबत नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

सायबर फसवणूक झाल्यास तातडीने तक्रार करा!

अनोळखी किंवा संशयास्पद लिंक उघडू नका.

अनोळखी व्यक्तींकडून आलेले ॲप किंवा फाईल डाऊनलोड करू नका.

बँक खात्याचा तपशील, एटीएम पिन, पासवर्ड आणि ओटीपी कोणालाही देऊ नका.

मोबाईलमध्ये संशयास्पद हालचाली आढळल्यास तातडीने बँकेशी संपर्क साधा.

आर्थिक फसवणूक झाल्यास विलंब न करता राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधा किंवा लूलशीलीळाश. सेंी.ळप या संकेतस्थळावर तक्रार नोंदवा.

फसवणुकीनंतर तातडीने तक्रार केल्यास संबंधित व्यवहारातील रक्कम रोखण्याच्या प्रयत्नांना मदत होऊ शकते.

गजानन धोंडगे, शाखा व्यवस्थापक, युनियन बँक ऑफ इंडिया, कोळपेवाडी.

ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी कर्मवीर काळे कारखान्यावर साखर शाळा सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : ऊसतोड कामगारांच्या स्थलांतरामुळे त्यांच्या मुलांचे शिक्षण अर्धवट राहू नये, त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवता यावे, यासाठी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर यंदाच्या गाळप हंगामासाठी साखर शाळा सुरू करण्यात आली आहे. कारखान्याचे चेअरमन आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या या शाळेचे उद्घाटन कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुका गटशिक्षणाधिकारी पिंकी वाजे यांच्या हस्ते करण्यात आले. कारखान्याचा गाळप हंगाम सुरू झाल्याने परिसरात मोठ्या संख्येने ऊसतोड कामगार दाखल झाले आहेत. पोटाची खळगी भरण्यासाठी गावोगाव भटकंती करणाऱ्या या कामगारांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, या उद्देशाने कारखाना कार्यस्थळावरील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालयाच्या माध्यमातून ही शाळा सुरू करण्यात आली आहे. या शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि फळांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना नियमित पोषण आहार देण्याची व्यवस्था करण्यात आली असून, त्यांना हसत-खेळत दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. गाळप हंगाम संपेपर्यंत विद्यार्थ्यांचे शिक्षण नियमित सुरू राहील, याची विशेष काळजी कारखाना व्यवस्थापनाकडून घेतली जाणार आहे. यावेळी कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे म्हणाले की, कर्मवीर शंकरराव काळे यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबांतील मुलांच्या शिक्षणासाठी मोठे योगदान दिले. त्यामुळे कारखान्यासाठी शिक्षण हा जिव्हाळ्याचा विषय आहे. ज्येष्ठ संचालक व मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे आणि चेअरमन आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या या साखर शाळेकडे व्यवस्थापनाचे विशेष लक्ष राहणार आहे. गटशिक्षणाधिकारी पिंकी वाजे म्हणाल्या की, शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा अधिकार आहे. स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी कारखान्याने सुरू केलेला हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे. या शाळेमुळे मुलांचे शिक्षण सुरू राहून त्यांचे भविष्य उज्ज्वल होण्यास मदत होईल.



जुन्या वादातून तरुणावर कत्तीने वार, सहा जणांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : नगर-राहुरी महामार्गावरील धामोरी फाटा येथे पूर्वीच्या वादातून एका ३७ वर्षीय तरुणावर सहा जणांनी कत्ती, लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना दि. ३ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास घडली. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अहिल्यानगर येथील एका रुग्णालयात उपचार सुरू आहेत. लक्ष्मीकांत शिवाजी उगले, (वय ३७ वर्षे, रा. धामोरी बुद्रुक, ता. राहुरी) या तरुणाचे दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास राहुरी तालुक्यातील वांबोरी फाटा येथे नितीन शाम जंगम याच्याशी त्याचा किरकोळ वाद झाला होता. यावेळी नितीन याने त्याला जीवे मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर लक्ष्मीकांत हा धामोरी फाटा येथून पायी घरी जात असताना आरोपींनी त्याला रस्त्यात अडवून शिवीगाळ केली. त्यानंतर कत्तीने वार करून लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. या घटनेत लक्ष्मीकांत उगले हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. उपचार सुरु असतानाच लक्ष्मीकांत शिवाजी उगले या तरुणाने पोलिसां समक्ष जबाब नोंदवून दिला. त्या जबाबावरुन आरोपी नितीन शाम जंगम, निखिल शाम जगंम, शाम शंकर जगंम, कृष्णा नामक तरुण, सर्व रा. धामोरी बुद्रुक, ता. राहुरी, व दोन आनोळखी इसम अशा सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

शाळा सुरू, शिक्षक मात्र झोपेत! विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ सुरू?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

एरंडगाव : विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देण्यासाठी शासनाकडून लाखो रुपये खर्च केले जात असताना, शेवगाव तालुक्यातील ढोरसडे अंत्रे येथील शिक्षक भाऊसाहेब माळवदे हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळेच्या वेळेतच शिक्षक झोप घेत असल्याचा प्रकार समोर आल्याने शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. शाळा सुरू असताना शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवण्याऐवजी झोप घेणे ही बाब अत्यंत गंभीर असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळा ही विद्यार्थ्यांच्या भविष्याची पायाभरणी करणारी जागा आहे. पालक आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांना शाळेत पाठवतात. मात्र, शाळेच्या वेळेतच शिक्षक झोप घेत असतील, तर विद्यार्थ्यांना शिक्षण कोण देणार? शासनाचा पगार घेऊन कर्तव्य बजावण्याऐवजी अशा प्रकारे निष्काळजीपणा होत असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाचे अधिकारी नेमके करतात तरी काय? शिक्षकांच्या उपस्थितीची तपासणी, अध्यापनाचा दर्जा आणि शाळेतील दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची आहे. मग शाळा सुरू असताना असा प्रकार घडत असेल, तर संबंधित अधिकाऱ्यांचे नियंत्रण नेमके कुठे आहे? केवळ कागदोपत्री तपासणी करून शिक्षणाचा दर्जा सुधारणार आहे का, असा सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे. मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करावी! या प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन सखोल चौकशी करावी. संबंधित शिक्षकांची उपस्थिती, अध्यापनाचे वेळापत्रक आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान याची तपासणी करून दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. शाळा सुरू असताना शिक्षक झोपेत असतील, तर विद्यार्थ्यांचे भविष्य जागे कोण ठेवणार?

फटाके स्टॉलच्या परवान्यांची तपासणी होतेय का? सुरक्षिततेच्या नियमांच्या अंमलबजावणीचा प्रश्न!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बेलवंडी : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बेलवंडी पोलीस ठाणे आणि श्रीगोंदा पोलीस ठाणे हद्दीत शहरासह ग्रामीण भागात विविध ठिकाणी फटाके विक्रीसाठी तात्पुरते स्टॉल उभारले जातात. मात्र, या स्टॉलधारकांकडे अधिकृत परवाने आहेत का? स्टॉल उभारणी करताना स्फोटक नियम २००८ मधील नियमांचे पालन केले जात आहे का? अग्निसुरक्षेची पुरेशी व्यवस्था आहे का? असे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे मार्च २०२६ मध्ये केंद्र सरकारने स्फोटक नियमांमध्ये सुधारणा करून स्वतंत्र फटाके दुकानांसाठी अतिरिक्त अग्निसुरक्षा अटी लागू केल्या आहेत. यामध्ये अग्निशामक यंत्रे, सुरक्षित प्रवेश व आपत्कालीन बाहेर पडण्याची व्यवस्था यांचा समावेश आहे. श्रीगोंदा तालुक्यात दिवाळीनिमित्त किती फटाके विक्री परवाने मंजूर करण्यात आले, किती स्टॉलची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली, अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले का आणि विनापरवाना विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार? याची माहिती प्रशासनाने सार्वजनिक करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. श्रीगोंदा तालुक्यातील श्रीगोंदा शहर,बेलवंडी, काष्टी, कोळगाव या मोठ्या गावात फटाका खरेदी साठी मोठी गर्दी असते. त्यामुळे दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी महसूल, पोलीस आणि अग्निशमन विभागाने संयुक्त तपासणी मोहीम राबविणे आवश्यक आहे.

ऊसतोड कामगारांच्या झोपडीत दिवाळीचा आनंद । २७ कुटुंबांना किराणा व फराळाचे वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आधी : दिवाळीचा आनंद समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने संत श्री आसारामजी बापू आश्रम (कोल्हार भगवतीपूर) अंतर्गत कार्यरत श्री योग वेदांत सेवा समितीच्या वतीने आश्वी पंचक्रोशीतील गरजू व वंचित कुटुंबांना दिवाळी फराळ, मिठाई आणि जीवनावश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे शेकडो गरजू कुटुंबांची दिवाळी गोड झाली. आश्वी खुर्द येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृह परिसरात तात्पुरत्या झोपड्या उभारून वास्तव्यास असलेल्या २७ ऊसतोड कामगार कुटुंबांना विशेष मदत करण्यात आली. गावापासून दूर राहून कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कष्ट करणाऱ्या या कामगारांना दिवाळीचा आनंद घेता यावा, यासाठी फराळ, मिठाई, दैनंदिन वापराचे किराणा साहित्य आणि संत साहित्याचे वाटप करण्यात आले. सणाच्या काळात मिळालेल्या या मदतीमुळे कामगार कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले. समितीच्या वतीने आश्वी खुर्द, कनोली, हंगेवाडी आणि पिंपरणे या चार गावांतही सेवाकार्य राबविण्यात आले. यावेळी गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्याबरोबरच अन्नदान आणि भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. समाजातील गरजू व्यक्तींना सणाचा आनंद मिळावा, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमावेळी आश्वी खुर्दचे माजी सरपंच म्हाळु गायकवाड, उपसरपंच बाबा भवर, अशोक अनाप, सोमनाथ काळे, कैलास गायकवाड, बाळासाहेब शिंदे, विकास गायकवाड, पत्रकार संजय गायकवाड, रामदास फड, गणेश शेळके, निवृत्ती नागरे, राजू गीते, मिनिनाथ मुंतोडे, डॉ. झरेकर, कोल्हे, कानडे, कोरडे, रमेश साबळे, शिवप्रसाद वर्पे यांच्यासह ग्रामस्थ आणि समितीचे स्वयंसेवक उपस्थित होते. वंचितांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांच्या मनातील समाधान हेच या सेवाकार्याचे खरे फलित असल्याची भावना समितीच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. या उपक्रमाचे लाभार्थ्यांनीही स्वागत करून समितीप्रती कृतज्ञता व्यक्त केली.